
https://epaper.vidarbhaprajasattak.com follow us on

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १९९ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. ६ सप्टेंबर २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६







RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १९९ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. ६ सप्टेंबर २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६




## पंतप्रधान नरेंद्र मोदींचा अमेरिका दौरा रद्द
### आता एस. जयशंकर करणार UNGA मध्ये भारताचे प्रतिनिधित्व

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६नवी दिल्ली**

ऑपरेशन सिंदूरदरम्यान भारत पाकिस्तानमध्ये युद्धविराम घडवून आणल्याचा दावा आणि भारतावर लादलेलं अतिरिक्त टॅरिफ यामुळे सध्या भारत आणि अमेरिका यांच्यातील द्विपक्षीय संबंध कमालीचे बिघडले आहेत. त्याच पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा या महिन्याच्या अखेरीस होणारा अमेरिकेचा दौरा रद्द करण्यात आला असून, त्यामुळे नरेंद्र मोदी हे संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेच्या बैठकीत



सहभागी होणार नाहीत. त्यांच्या जागी परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर हे संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेमध्ये भारताचं प्रतिनिधित्व करणार आहेत. सभेतील वक्त्यांची सुधारित यादी प्रसिद्ध झाल्यानंतर ही माहिती समोर आली आहे.

संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेचं ८०वं अधिवेशन हे ९ सप्टेंबरपासून सुरू होणार आहे. तर २३ ते २९ सप्टेंबरदरम्यान, उच्चस्तरीय बैठक होणार आहे. या बैठकीत पहिला वक्ता ब्राझील असेल, तर त्यानंतर अमेरिका आमसभेला संबोधित करणार आहे.


अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प २३ सप्टेंबर रोजी यूएनजीएच्या पोडियमवरून जगाला संबोधित करतील. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष म्हणून ट्रम्प हे दुसऱ्या कार्यकाळात पहिल्यांदा संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेला संबोधित करणार आहेत.

भारताकडून परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर २७ सप्टेंबर रोजी या अधिवेशनाला संबोधित करतील. यापूर्वी जुलै महिन्यात प्रसिद्ध करण्यात आलेल्या आमसभेतील वक्त्यांच्या यादीमध्ये भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं नाव होतं. तसेच मोदी हे २६ सप्टेंबर रोजी आमसभेला संबोधित करणार होते. मात्र आता त्यांचा दौरा रद्द झाल्याने यात बदल करण्यात आला आहे.

## 'गणपती दरम्यान मुंबईत स्फोट' मॅसेज करणाऱ्या भामट्याला पोलिसांनी केली अटक
### नोएडा पोलीस आणि मुंबई पोलिसांचे सर्वत्र कौतुक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मुंबई शहरात बॉम्बस्फोट घडवण्याची धमकी देणाऱ्या एका आरोपीला नोएडा पोलिसांनीअटक केली आहे. आरोपीचे नाव अश्विनी असून, तो मूळचा बिहारचा आहे आणि नोएडाच्या सेक्टर-११३ भागात गेल्या पाच वर्षांपासून राहत होता. मुंबईपोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नोएडा पोलिसांनी ही कारवाई करत आरोपीला ताब्यात घेतले असून, पुढील



तपासासाठी त्याला मुंबई पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी अश्विनीने व्हॉट्सप संदेशाद्वारे मुंबई पोलिसांना धमकी दिली होती. 'लष्कर-ए-जिहादी' या दहशतवादी संघटनेचे १४ दहशतवादी मुंबईत घुसले असून, ते ३४ गाड्यांमध्ये तब्बल ४०० किलो आरडीएक्स वापरून मोठा स्फोट घडवणार आहेत. या स्फोटात एक कोटी लोकांचा बळी जाण्याची शक्यता असल्याचे त्याने या संदेशात म्हटले होते. या संदेशामुळे सुरक्षा यंत्रणांमध्ये एकच खळबळ उडाली होती.

मुंबई पोलिसांकडून माहिती मिळताच, नोएडा पोलिसांचे सीपी लक्ष्मी सिंह यांच्या निर्देशानुसार पोलीस आणि स्वाट टीमने तात्काळ कारवाई केली. तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे , पोलिसांनी आरोपी अश्विनीला त्याच्या ठिकाणावरून अटक केली. पोलिसांनी त्याच्याकडून धमकी देण्यासाठी वापरलेला मोबाइल फोनही जप्त केला आहे.

आता मुंबई पोलीस आरोपीला ताब्यात घेऊन त्याची सखोल चौकशी करत आहेत. हा आरोपी मानसिकदृष्ट्या अस्वस्थ आहे की तो एखाद्या मोठ्या षड्यंत्रात सामील आहे, याचा तपास सध्या सुरू आहे. गणेशोत्सव सुरू असताना अशा धमक्यांमुळे लोकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते, मात्र पोलिसांच्या जलद कारवाईमुळे हा धोका टळला. यामुळे, नोएडा पोलीस आणि मुंबई पोलिसांचे कौतुक होत आहे.

## मुख्यमंत्र्यांच्या गणरायाचे विसर्जन
### पुढच्या वर्षी लवकर या म्हणत गणरायाला निरोप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६मुंबई**

१० दिवसांच्या पाहुणचारानंतर मुंबईकर आपल्या लाडक्या गणपती बाप्पाला अनंत चतुर्दशीच्या दिवशी निरोप देत आहेत. मुंबईमध्ये सार्वजनिक गणेशाच्या मूर्ती विसर्जनासाठी निघाल्याचे दृश्य सर्वत्र दिसत आहे. मुख्यमंत्र्यांचे शासकीय निवासस्थान वर्षा बंगल्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते गणरायाची उत्तर पूजा करण्यात आली. त्यानंतर आरती झाली आणि गणरायाला भावपूर्ण वातावरणात निरोप देण्यात आला.

बाप्पाला अत्यंत भावनिक वातावरणात निरोप : अनंत चतुर्दशीदिवशी गणरायाच्या निरोपावेळी मुख्यमंत्र्यांची पत्नी अमृता फडणवीस, लेक दिविजा आणि कुटुंबासह देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर पूजा केली. यानंतर



उत्साहात बाप्पाची आरती करण्यात आली. आरतीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या बाप्पाला निरोप देण्यात आला. तेथील कृत्रिम तलावामध्ये गणपती बाप्पाचे विसर्जन करण्यात आले. अनेक मान्यवर वर्षा बंगल्यावर आरतीसाठी उपस्थित होते. यावेळी १० दिवस सोबत राहिलेल्या बाप्पाला अत्यंत भावनिक वातावरणात निरोप देण्यात आला.

राज्यातील जनतेच्या कल्याणासाठी प्रार्थना : तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १० दिवस मुंबईसह महाराष्ट्रात बाप्पाच्या आगमनाने एक प्रकारचा खूपच अनुकूल उत्साह संचारलेला आहे, असे सांगत अतिशय उत्साहात आणि आनंदात विसर्जन होत आहे, असे सांगितले. त्याचबरोबर त्यांनी राज्यातील जनतेच्या कल्याणासाठी प्रार्थना केली. राज्यात शांतता नांदो, सर्वांचे विघ्न दूर होवोत, अशी प्रार्थना केल्याचे सांगितले. महाराष्ट्रासाठी बाप्पाकडे सुख, समृद्धी आणि भरभराट दे असा आशीर्वाद दे असे आपण बाप्पाकडे मागणे मागितले असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. त्याचबरोबर बाप्पाला शांततेत आणि शिस्त पाळत निरोप द्या, असे आवाहन त्यांनी जनतेला केले.

अनेक मान्यवरांनी बाप्पाच्या दर्शनासाठी लावली होती हजेरी : दरवर्षीप्रमाणे यंदाही मुख्यमंत्र्यांच्या वर्षा या निवासस्थानी गणरायाची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि त्यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी संपूर्ण कुटुंबासमवेत बाप्पाची विधिवत पूजा केली. मुख्यमंत्र्यांच्या गणपती बाप्पासाठी अत्यंत साध्या आणि पर्यावरणपूरक अशा पद्धतीची आरास करण्यात आली होती. मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी केंद्रीय मंत्री अमित शाह यांच्याप्रमाणेच अनेक राजकीय नेत्यांनी बाप्पाच्या दर्शनासाठी हजेरी लावली होती.

## भाजपकडून उद्धव ठाकरेंचा 'पिपाण्या' म्हणून उल्लेख : ट्रम्प यांचे उदाहरण देत निशाणा
### राहुल गांधीच्या मातोश्रीचा मान राखायला दिल्लीला जात असल्याचा दावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६मुंबई**

अमेरिकी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आपण भारत आणि रशियाला चीनच्या हाती सोपवले, असे म्हणत भारत, चीन आणि रशिया संबंधांवर आपले मत व्यक्त केले आहे. मात्र आता यावरून भारतीय जनता पक्षाचे नेते केशव उपाध्ये यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला आहे. चांगले मित्र गमावणे हा विश्वासघात, आरेरावे आणि मुजोरीचा अंतिम टप्पा असतोच. महाराष्ट्रात देखील उद्धव ठाकरे आणि शरद पवार हेच वाक्य म्हणत असल्याचे केशव उपाध्ये यांनी म्हटले आहे. मात्र, केवळ भारत आणि रशिया ऐवजी तिथे वेगळे शब्द असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

या संदर्भात केशव उपाध्ये यांनी एका सोशल मीडियावरील पोस्टच्या माध्यमातून उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला. भारतीय जनता पक्षाच्या काळामध्ये बाळासाहेब ठाकरे यांच्या मातोश्रीला असलेला मान आता गेला आहे. आता राहुल गांधींच्या मातोश्रीचा मान राखण्यासाठी उद्धव ठाकरे दिल्लीला जात असल्याचे देखील



केशव उपाध्ये यांनी म्हटले आहे. त्यांनी उद्धव ठाकरे यांचा उल्लेख 'पिपाण्या' असा देखील केला आहे.

**किशोर उपाध्ये यांनी केलेली पोस्ट देखील पहा**

या संदर्भात भारतीय जनता पक्षाचे नेते केशव उपाध्ये यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली आहे. यामध्ये त्यांनी उद्धव ठाकरे यांचा उल्लेख 'पिपाण्या' असा केला आहे. आपल्या पोस्टमध्ये त्यांनी लिहिले की, 'आपण भारत व रशियाला चीनच्या हाती सोपविले' अशा आशयाचे हताश उद्धार अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोल्डान्ड ट्रम्प यांनी काढले. चांगले मित्र गमावणे हा विश्वासघात, अरेरावी व मुजोरीचा अंतिम टप्पा असतोच. आमच्या महाराष्ट्रातसुध्दा याच गुणांमुळे उध्दवराव व शरद पवार हेच वाक्य म्हणत आहेत, फक्त भारत व रशियाऐवजी वेगळे शब्द आहेत. उबाठाची अरेरावी अनेकवेळा सहन करीत, सन्मान, आदर देऊनही भाजपासोबत विश्वासघात करून उध्दव ठाकरे यांनी मुख्यमंत्रीपदाच्या लालसेपोटी भाजपालाच धोका दिला. आता सगळेच गमावून काँग्रेसचे अंकित होऊन बसले. भाजपाच्या काळात बाळासाहेब ठाकरे यांच्या 'मातोश्री'ला असणारा मान आता गेला. आता राहुल गांधीच्या मातोश्रीचा मान राखायला उद्धव ठाकरे दिल्लीला जातात. ते 'ट्रम्प' आणि हे 'पिपाण्या' एवढाच काय तो फरक!!

## राज ठाकरेंना मिळणार खास मान...
### यंदाचा शिवसेनेचा 'दसरा मेळावा' ठाकरे बंधू गाजवणार?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६मुंबई**

आगामी महापालिका निवडणुकीच्या दृष्टीने यंदाच्या दसरा मेळाव्याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे. दरवर्षी दादरच्या छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर शिवसेनेकडून दसरा मेळावा घेतला जातो. या मेळाव्याला राज्यभरातून लाखो शिवसैनिक येतात मात्र यंदाचा मेळावा वेगळा असणार आहे. मागील काही दिवसांपासून राज्यात ठाकरे बंधूंमधील दुरावा कमी झाल्याचे चित्र राज्याने पाहिले आहे. मनपा निवडणुकीत ठाकरे बंधू एकत्रित येणार अशी चर्चा आहे. त्यातच यंदाच्या दसरा मेळाव्यात राज ठाकरेंना खास मान मिळणार असल्याचे संकेत उद्धवसेनेच्या नेत्याकडून देण्यात आले.

माजी मंत्री सचिन अहिर म्हणाले की, निव्वळ दोन पक्षासाठी नव्हे तर राज्यासाठी ठाकरे बंधूंनी एकत्रित यावेत ही लोकांच्या मनातील भावना आहे. गणपती झाल्यानंतर आता दसरा येईल त्यात निश्चितपणे एखादी चांगली बातमी मिळेल अशी अपेक्षा केली तरी हरकत नाही. दसरा मेळाव्यात पक्षाचे नेतृत्व संकेत न देता वस्तूस्थिती काय, कशाप्रकारे आगामी



काळात निवडणुकीला सामोरे जायचे आहे त्याचे मार्गदर्शन होईल. दसरा मेळावा हा पक्षाचा नाही, राजकीय आणि सामाजिक दृष्टीकोनातून राज्यात जे घडतंय, त्यावर वाटचाल केली जाते. त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये निश्चित उत्सुकता आहे असं त्यांनी सांगितले.

तसेच दसरा मेळाव्यात दोन भाऊ एकत्रित दिसतील की नाही हा वेगळा भाग आहे. २ राजकीय पक्ष आहेत. आमचा जसा दसरा मेळावा असतो, तसा त्यांचाही गुढीपाडवा मेळावा असतो. त्यामुळे आम्ही त्यांना आमंत्रित करू, ते आम्हाला आमंत्रित करतील अशीही शक्यता असते. राजकीय व्यासपीठावर आम्ही एकत्र येतो, तेव्हा पक्षाचा आणि युतीचा व्यासपीठ वेगळे असतात. परंतु नक्कीच यावेळचा दसरा मेळावा न भूतो, न भविष्य असा असेल हा विश्वास माजी मंत्री सचिन अहिर यांनी व्यक्त केला. एबीपी माझाला दिलेल्या मुलाखतीत ते बोलत होते. दरम्यान, मुंबईची भौगोलिक परिस्थिती बदलत चालली आहे. त्यामुळे निश्चितपणे ही निवडणूक मराठी माणसांच्या अस्तित्वाची असणार आहे. आपले अस्तित्व राहणार की नाही असा प्रश्न निर्माण झाला आहे. २५ वर्षातलं मुंबईचं स्वरूप बदलत चाललेले आहे, त्यामुळे सर्वसामान्य मराठी माणूस, मुंबईकर माणूस टिकवण्यासाठी या दोन्ही भावांनी एकत्र यायला हवे असंही सचिन अहिर यांनी म्हटलं आहे.

## मुंबईत गणेश विसर्जनाची धूम; 'मुंबईचा राजा' निघाला, 'लालबागचा राजा'साठी भक्तांची अलोट गर्दी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६मुंबई**

मुंबई : गेल्या १० दिवसांपासून भक्तांच्या मनांवर अधिराज्य गाजवणाऱ्या लाडक्या गणपती बाप्पांचे आज शनिवार (६ सप्टेंबर) मुंबईसह महाराष्ट्रभर भव्य विसर्जन पार पडत आहे. शहराच्या विविध भागांतून, विशेषतः लालबाग, चिंचपोकळी, भायखळा, परेल आणि गिरगाव चौपाटीवर हजारो भक्त गणपतींच्या विसर्जनासाठी एकत्रित येतात. सार्वजनिक गणेश मंडळांतील बाप्पांना ढोलताशा, डीजे आणि लेझिम पथकांच्या तालावर मिरवणूक काढून विसर्जनासाठी घेऊन जाताना पाहायला मिळतं. विशेष म्हणजे, सध्या 'लालबागचा राजा' साठी लालबाग परिसरात मोठ्या प्रमाणात भक्तांची गर्दी झाली असून मुंबईचा राजा गणपती विसर्जनासाठी निघाला आहे. शहरातील प्रशासनानं विसर्जन सोहळा सुरळीत आणि सुरक्षितपणे पार पडावा यासाठी सुरक्षा, वाहतूक आणि स्वच्छता यावर खास लक्ष दिलं आहे. मुंबईकरही उत्साहानं आणि संयमानं या सणाचा आनंद घेताना दिसत आहेत.

लालबाग परिसरात गणेश भक्तांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. दरम्यान, मुंबई व उपनगरात पहाटेपासून पावसाची रिपरिप सुरू होती, पण सध्या पावसानं उसंत घेतली आहे. त्यामुळे विसर्जन सोहळ्यासाठी वातावरण अनुकूल आहे.

लालबागच्या राजाची आरती संपल्यानंतर हा मानाचा गणपती मंडपातून विसर्जनासाठी मार्गस्थ होईल. तत्पूर्वी, लालबागमधील मुंबईचा राजा आणि तेजूकाय गणपती आधी मंडपातून बाहेर काढले गेले. यानंतरच लालबागचा राजा गणपती विसर्जनासाठी मार्गस्थ होतो. सध्या लालबागच्या राजाच्या दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भक्तांची गर्दी झालेली असून, दूरवरून आलेल्या भक्तांनी दर्शन घेण्यासाठी मोठ्या उत्साहानं गर्दी केली आहे.

## आशिया कप; भारत-पाकिस्तान सामन्याची उत्सुकता शिगेला; वेळापत्रक जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६मुंबई**

इंग्लंड दौऱ्यानंतरच्या मोठ्या ब्रेकमुळे कंटाळलेल्या टीम इंडियाच्या फॅन्सची प्रतीक्षा लवकरच संपणार आहे. ९ सप्टेंबर पासून संयुक्त अरब अमिराती १७ वी आशिया कप स्पर्धा खेळली जाणार आहे. या स्पर्धेत टीम इंडिया सहभागी होणार आहे. भारत-पाकिस्तान संघर्षानंतर या स्पर्धेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झालं होतं. पण, ही स्पर्धा अखेर होणार आहे. पहलगाममधील दहशतवादी हल्ला आणि 'ऑपरेशन सिंदूर' नंतर पहिल्यांदाच भारत आणि पाकिस्तानच्या क्रिकेट टीम टीम एकमेकांच्या समोर उभ्या राहणार आहेत. त्यामुळे या स्पर्धेकडे संपूर्ण जगाचं लक्ष लागलंय.

**संपूर्ण वेळापत्रक**
**साखळी फेरी**

**ग्रुप –**
१० सप्टेंबर: भारत vs UAE, दुबई, रात्री ८:००
१२ सप्टेंबर: पाकिस्तान vs ओमान, अबू धाबी, रात्री ८:००
१४ सप्टेंबर: भारत vs पाकिस्तान, दुबई, रात्री ८:००
१५ सप्टेंबर: UAE vs ओमान, अबू धाबी, सायं. ५:३०
१७ सप्टेंबर: पाकिस्तान vs UAE, दुबई, रात्री ८:००
१९ सप्टेंबर: भारत vs ओमान, अबू धाबी, रात्री ८:००

**ग्रुप इ**
९ सप्टेंबर: अफगाणिस्तान vs हाँगकाँग, अबू धाबी, रात्री ८:००
११ सप्टेंबर: बांगलादेश vs हाँगकाँग, दुबई, रात्री ८:००
१३ सप्टेंबर: श्रीलंका vs बांगलादेश, अबू धाबी, रात्री ८:००
१५ सप्टेंबर: श्रीलंका vs हाँगकाँग, दुबई, सायं. ५:३०
१६ सप्टेंबर: बांगलादेश vs अफगाणिस्तान, अबू धाबी, रात्री ८:००
१८ सप्टेंबर: श्रीलंका vs अफगाणिस्तान, दुबई, रात्री ८:००

**सुपर फोर**
२० सप्टेंबर: गट इ क्वालिफायर १ vs गट इ क्वालिफायर २, रात्री ८:००
२१ सप्टेंबर: गट – क्वालिफायर १ vs गट – क्वालिफायर २, रात्री ८:००
२३ सप्टेंबर: गट – क्वालिफायर १ vs गट इ क्वालिफायर २, रात्री ८:००
२४ सप्टेंबर: गट इ क्वालिफायर १ vs गट – क्वालिफायर २, रात्री ८:००
२५ सप्टेंबर: गट – क्वालिफायर २ vs गट इ क्वालिफायर २, रात्री ८:००
२६ सप्टेंबर: गट – क्वालिफायर १ vs गट इ क्वालिफायर १, रात्री ८:००

**फायनल**
२८ सप्टेंबर: फायनल, रात्री ८:००

## संपादकीय ......

# दरारा की दबाव? दादांच्या कारभारावर प्रश्नचिन्ह!

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा व्हायरल व्हिडीओ सध्या खूपच चर्चेत आहे. सोलापूरच्या कुर्डू गावातील मुरूम उत्खनन करणार्यांवर कारवाई करत असलेल्या एका आयपीएस अधिकारी महिलेला अजित पवार फोनवरून दमदाटी करताना त्यात दिसतात. म्हणजेच या व्हिडीओत त्यांचा आवाज ऐकू येत आहे. यावरून मागच्या दोन दिवसांपासून टीका झेलत असलेल्या अजित पवारांना अखेर नाईलाजास्तव का होईना या प्रकरणावर खुलासा करावा लागला आहे. अंजली कृष्णा नावाच्या या महिला आयपीएस अधिकारी आहेत. कुर्डू गावातील मुरूम उत्खनन करणार्या काही जणांवर त्या कारवाई करत होत्या. ते सर्वजण राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते होते. त्यांच्यापैकी एक राष्ट्रवादीचा तालुकाध्यक्ष होता. चार ते पाच दिवसांपूर्वीचे हे प्रकरण असल्याचे म्हटले जाते. अंजली कृष्णा कारवाईच्या पवित्र्यात असताना राष्ट्रवादीचे हे कार्यकर्ते त्यांना शाब्दिक प्रतिकार करत होते. ही चकमक सुरू असतानाच तालुका अध्यक्षांनी थेट अजित पवारांनाच फोन लावत हा फोन अंजली कृष्णा यांच्या हाती सोपवला. यावेळी अजित पवारांनी संबंधितांना सोडून देण्याचे निर्देश तालुका अध्यक्षांच्या फोनवरून कृष्णा यांना दिले. यातूनच पुढची गडबड झाली.

कृष्णा या मूळच्या महाराष्ट्राबाहेरील असल्यामुळे त्यांना अजित पवारांचा आवाज ओळखू आला नसावा. मैं डीसीएम अजित पवार बोल रहा हूँ. ये कारवाई बंद करोमेरा आदेश हैं.. असे अजित पवार त्यांना हिंदीतून सांगत होते. शेवटी त्या कुणी सर्वसामान्य व्यक्ती नाहीत की कुणाच्याही बोलण्यावर सहज विश्वास ठेवतील. त्या आयपीएस अधिकारी आहेत. त्यामुळेच त्यांनी खातरजमा करण्यासाठी माझ्या वैयक्तिक फोनवर कॉल करा, असे अजित पवारांना सांगितले. ज्यात काहीही चुकीचे नव्हते. मात्र, त्यामुळे अजित पवारांचा पारा आणखीनच चढला. मैं तुम पे ॲक्शन लूंगा.. इतनी डेरिंग है तुम्हारी.. मेरा चेहरा तो पेहचानोगी ना.. असे म्हणत अजित पवारांनी शेवटी त्यांना व्हिडीओ कॉल केला. हाच तो व्हिडीओ जो बघता बघता व्हायरल झाला आणि खुद्द उपमुख्यमंत्र्यांनी कारवाईचा इशारा दिल्यामुळे चिंतेत असलेल्या आयपीएस अधिकारी महिलेला प्रशासकीय स्तरातून पाठिंबा मिळू लागला. अजित पवार हे आपल्या रांगड्या स्वभावासाठी ओळखले जातात. सकाळपासूनच त्यांच्या कामाचा सपाटा सुरू होतो ते रात्री उशिरापर्यंत. अजित पवार एका बाजूला प्रशासकीय अधिकारी आणि दुसर्या बाजूला कार्यकर्त्यांच्या गराड्यात काम उपसत असतात. अजित पवारांकडे काम घेऊन गेलेला पक्षाचा कुठलाही पदाधिकारी, कार्यकर्ता खाली हाताने किंवा निराश मानेने परतत नाही ही अजित पवारांची ख्याती आहे.

मागच्या कित्येक वर्षांपासून अव्याहतपणे सुरू असलेला अजितदादांच्या कामाचा उरक बघून त्यांचे विरोधकही त्यांचे तोंड भरून कौतुक करताना दिसतात. महाराष्ट्रातील प्रशासकीय व्यवस्थेची नस अजित पवारांना चांगलीच माहीत आहे. ही यंत्रणा कशी काम करते आणि तिच्याकडून कशा रितीने काम करून घेतले पाहिजे हेदेखील अजित पवार चांगलेच ओळखून आहेत. त्यामुळे कधीकधी कामात हयगय झाल्यास अधिकारी-कर्मचार्यांना जाहीररित्या दमदाटी करायलाही ते मागेपुढे पाहात नाहीत. भीतीयुक्त दरारा निर्माण करणारे अजितदादा जाहीर व्यासपीठावर बोलताना कधीकधी तारतम्य विसरतात हेही तितकेच खरे. धरणातील पाणी संपल्यावर काय करायचं, याविषयी त्यांनी केलेले अफलातून विधान तर जगजाहीर आहे. पुण्यातील येरवडा कारगृहाच्या जमिनीचा मुद्दाही असाच गाजला होता. ताज्या प्रकरणातला फरक एवढाच की अजित पवारांच्या फोनमुळे ते बेकायदेशीर मुरुम उत्खनन कारवाईत हस्तक्षेप करत असल्याचे चित्र तयार झाले. मागच्या काही वर्षांमध्ये राज्यातील गाव-खेडी शहरांचा झपाट्याने विकास होत आहे. परिणामी गावातील लहानशा बांधकामांपर्यंत मर्यादित असणार्या वाळूची मागणी अलीकडच्या काळात प्रचंड वाढली आहे. वाळू उत्खननातून अत्यंत कमी कालावधीत बेसुमार पैसा मिळत असल्याने गाव-खेड्यातील तरुण मोठ्या संख्येने या व्यवसायात उतरला आहे. त्यातही संबंधित परिसरात ज्या राजकीय पक्षाचा दबदबा आहे त्या पक्षातील पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी या व्यवसायात जम बसवला आहे. तर, काही ठिकाणी वाळू माफिया तयार झाले आहेत. हे वाळू माफिया सर्व सरकारी नियम पायदळी तुडवून दिवस-रात्र वाळूचा उपसा करतात. वाळू तस्करांनी त्यांची स्वत:ची बेकायदेशीर यंत्रणाही बनवली आहे. जेसीबी, पोकलेन, यांत्रिक बोटी अशा अजस्र यंत्रांनी या व्यवसायात प्रवेश केला आहे. माफिया, सरकारी यंत्रणा आणि राजकीय वरदहस्त अशा साखळीच्या माध्यमातून नदीपात्रातील वाळू उपसून शहरांकडे पाठवली जाते.

अवैधरित्या वाळूचा उपसा करणार्या वाळू माफियांवर कारवाई करणार्या महसूल विभागाच्या पथकांवर वाळू माफियांनी हल्ले केल्याची अनेक उदाहरणे आहे. वाळूचा अवैध उपसा रोखून वाळू माफियांना चाप लावण्यासाठी महसूल विभागाने मध्यंतरीच्या काळात कठोर पावले उचलली होती. गौण खनिजासंदर्भातील अधिकार आता जिल्हाधिकार्यांकडे देण्यात आले आहेत. अवैध वाळू उत्खनन व वाहतूक करणार्या वाळू माफियांवर एमपीडीए अंतर्गत गुन्हे नोंदवण्याचे तसेच या तस्करीत सामील महसूल अधिकारी, कर्मचार्यांवर निगराणी ठेवण्यात यावी. त्यांच्यावरही कडक कारवाईचे आदेश राज्य सरकारने जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांना दिलेत. वाळू माफियांवर कारवाई करताना मंत्री, खासदार, आमदारांच्या सूचना आल्या तरी त्यांना सोडू नका, अशी भूमिका राज्य सरकारची असताना खुद्द उपमुख्यमंत्र्यांकडून तसा आदेश आल्याने यंत्रणांचे खच्चीकरण होणे स्वाभाविक आहे. पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांच्या दबंग दुनियेतल्या दादांनी इथे थोडे तारतम्य बाळगायची गरज होती. अर्थात महिला अधिकार्यांबद्दल आदरभाव व्यक्त करून वाळू माफियांविरोधात कठोर कारवाईस कटिबद्ध आहे, असा खुलासा दादांनी केला हे बरेच झाले. फक्त ते कृतीतून उतरायला हवे.

# सह्याद्रीच्या हृदयातील अभेद्य गड : प्रतापगड

सह्याद्रीच्या उंचसखल डोंगररांगांमध्ये, दाट जंगलांच्या कुशीत आणि नागमोडी घाटांच्या वळणावर अभिमानाने उभा असलेला प्रतापगड हा मराठा इतिहासातील एक सोनेरी पान आहे. या गडाचे सामरिक महत्त्व केवळ त्याच्या उंचसखल भौगोलिक रचनेत नाही, तर आजूबाजूच्या दऱ्या, खोऱ्या आणि घाटांवर ठेवलेल्या नियंत्रणातही दडलेले आहे. महाराष्ट्रातील एक प्रसिद्ध डोंगरी किल्ला म्हणून या किल्ल्याची ओळख आहे. सातारा जिल्ह्यातील जावळी तालुक्यात महाबळेश्वरच्या नैर्ऋत्येस १३ कि.मी. वर हा किल्ला असून त्याची समुद्रसपाटीपासून उंची १,०९२ मी. आहे. पूर्वेकडील बाजूस ३४० मी. आणि पश्चिमेकडे ८७० मी. खोल दरी आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी जावळी खोरे जिंकल्यानंतर मोरो त्रिंबक पिंगळे यांना १६५६ मध्ये हा किल्ला बांधून घेण्याची आज्ञा दिली.

प्रतापगड हा बालेकिल्ला आणि त्याच्या सभोवतालचा खालचा भाग, अशा दोन प्रमुख भागात विभागलेला आहे. डोंगराच्या शिखरावर असलेल्या बालेकिल्ल्यात राजवाडा, सदर, केदारेश्वर मंदिरे, पाण्याच्या टाक्या आणि धान्य-रसद साठवणीसाठीच्या कोठाऱ्या यांसारखी महत्त्वाची बांधकामे होती. तर दक्षिण व पूर्व उतारावर बांधलेल्या खालच्या भागात पहिली तटबंदी आणि प्रचंड बुरुज शत्रूला दरीतच अडकवून ठेवण्यासाठी होती.मुख्य किल्ला, माची आणि बालेकिल्ला असे या किल्ल्याचे तीन भाग होतात. मुख्य किल्ला व बालेकिल्ला भागांत तलाव असून संरक्षणाच्या दृष्टीने किल्ल्याच्या चोहोबाजूंस भक्कम तटबंदी व बुरूज आहेत. बालेकिल्ल्याचे क्षेत्रफळ ३,६६० चौ. मी., तर मुख्य किल्ल्याचे ३,८८५ चौ. मी असून दक्षिणेकडील बुरूज १० ते १५ मी. उंचीचे आहेत. त्यांपैकी रेडका, राजपहारा, केदार इ. बुरुजांचे अवशेष टिकून आहेत. बुरूज वैशिष्ट्यपूर्ण असून निमुळत्या डोंगर धारेच्या शेवटी आहे. या भागाला माची म्हणतात. कारण अशाच स्वरूपाचे बांधकाम राजगड (सुवेळा व संजीवनी), तोरणा ( झुंजार) या किल्ल्यांवरील माच्यांना आहे. किल्ल्याची तटबंदी काही ठिकाणी तब्बल



४० फूट उंच असून तिच्या भक्कम रचनेमुळे प्रतापगड अभेद्य बनला होता. संपूर्ण बांधकाम काळ्या पाषाणात केले गेले आहे. गडाच्या उंच बुरुजांवरून जावळीच्या खोऱ्यातील डोंगर-दऱ्यांवर सतत नजर ठेवता येत असे, त्यामुळे शत्रूच्या हालचाली वेळेत ओळखणे सोपे होत असे.मुख्य किल्ल्यात प्रवेश करण्यासाठी दोन दरवाजे पार करून जावे लागते. दोन्ही दरवाजांवर शरभाच्या प्रतिमा दिसतात. दोन दरवाजे पार केल्यावर तुळजा भवानीचे मंदिर आहे. या देवालयासमोर दोन उंच दीपमाळा आहेत. त्या जवळच नगारखान्याची इमारत आहे. भवानी देवीचे मूळ मंदिर दगडी गाभाऱ्याचे होते. १८२० मध्ये

**संजय डी.ओरके**
**विभागीय संपर्क अधिकारी,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,मंत्रालय, मुंबई.**

साताराच्या प्रतापसिंह महाराजांनी तेथे लाकडी मंडप बांधला.अरुंद, नागमोडी चढणाऱ्या वाटा आणि दारांच्या पुढे लपवलेले मजबूत अडथळे यामुळे कुणालाही सरळपणे गडावर प्रवेश करणे शक्य नव्हते. महादरवाजा तर संरक्षणकलेचा उत्कृष्ट नमुना मानला जातो. गोमुखी शैलीत बांधलेला हा दरवाजा रचनेत इतका कुशल होता की, अरुंद मार्गाने आत येणाऱ्या शत्रूंना दोन्ही बाजूंच्या बुरुजांतून सहज हल्ल्याच्या टप्प्यात आणले जाई.प्रतापगडाचे एक अनोखे वैशिष्ट्य म्हणजे त्याची सुसंरचित जलव्यवस्था. किल्ल्यावर चार प्रमुख पाण्याच्या टाक्या आहेत. यापैकी दोन बालेकिल्ल्यात तर दोन खालच्या भागात आहेत. पावसाचे पाणी साठवण्यासाठी नैसर्गिक उतारांचा कुशलतेने वापर करण्यात आला होता. त्यामुळे गडावरील लोकसंख्येला वर्षभर पुरेल इतका पाणीपुरवठा व्हायचा. ही योजना मराठ्यांच्या अभियांत्रिकी व व्यूहनीती कौशल्याचा अद्वितीय नमुना ठरते.प्रतापगडचे ऐतिहासिक महत्त्व अफझलखान छत्रपती शिवाजी महाराज भेट व त्याप्रसंगी झालेला अफझल खानाचा वध या घटनेमुळे वाढले (१६५९). छत्रपती राजाराम महाराज सुद्धा जिंजीस जात असताना प्रथम प्रतापगडास आले. स्वातंत्र्योत्तर काळात या किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य अश्वारूढ पुतळा उभारण्यात आला. त्याचे अनावरण १९५७ च्या नोव्हेंबर महिन्यात तत्कालीन पंतप्रधान पं.जवाहरलाल नेहरू यांनी केले.

आजही हजारो लोक केवळ त्या क्षणाशी नाते जोडण्यासाठी प्रतापगडावर भेट देतात. गडावर दरवर्षी शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. अफझलखान भेटीचे नाट्यरूप सादरीकरण, सांस्कृतिक कार्यक्रम आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनाशी निगडित उपक्रम यामुळे प्रतापगड महाराष्ट्राच्या अस्मिता आणि सांस्कृतिक एकतेचे केंद्र ठरतो.प्रतापगड मराठ्यांच्या धैर्य, रणनीती आणि स्वराज्याच्या स्वप्नाचा जिवंत साक्षीदार आहे.

सह्याद्रीच्या कुशीत उभा असलेला हा गड आजही भूतकाळ आणि वर्तमान यांना जोडणारा एक अढळ दुवा आहे.युनेस्कोने छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांना जागतिक वारसा मानंकन दिले असून त्यात प्रतापगडाला विशेष स्थान मिळाले आहे. त्यामुळे प्रतापगड आज केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित न राहता जगाच्या सांस्कृतिक वारशाचा एक अनमोल ठेवा म्हणून गौरवला जातो.

# सीसीआयचे 'कापुस किसान'ॲप

# शेतकऱ्यांसाठी कापसाची ऑनलाइन नोंदणी सुरू

**दि.६विदर्भ प्रजासत्ताक**

केंद्रीय कपूस निगम लिमिटेड (सीसीआय) शेतकऱ्यांसाठी 'कापस किसान' मोबाइल प उपलब्ध करून दिले आहे. यंदा सन २०२५-२६ सत्रासाठी कापसाच्या विक्रीसाठी शेतकऱ्यांना ऑनलाइन नोंदणी करणे अनिवार्य आहे.

किमान आधारभूत किंमत ८,११० रुपये प्रति क्विंटल जाहीर करण्यात आली असून नोंदणीची सुरुवात १ सप्टेंबर पासून सुरु झाली आहे आणि अंतिम मुदत ३० सप्टेंबर आहे.

केंद्रीय कपूस हंगामासाठी (सन २०२५-२६) भारतीय कापूस निगम लिमिटेड (सीसीआय) शेतकऱ्यांच्या ऑनलाइन नोंदणी प्रक्रियेस सुरुवात करत आहे. यंदा शेतकऱ्यांसाठी 'कपास किसान' हे मोबाइल प उपलब्ध करून देण्यात आले आहे, ज्याद्वारे शेतकरी स्वतः च्या मोबाइलवरून नोंदणी करू शकतील.

**नोंदणीची महत्त्वाची माहिती**

**नोंदणी कालावधी:** १ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर २०२५

प डाउनलोड: गुगल प्ले स्टोअर आणि पल स्टोरवरून उपलब्ध

किमान आधारभूत किंमत (हमीदर): ८,११० रुपये प्रति क्विंटल

नोंदणी न केलेल्या शेतकऱ्यांना किमान आधारभूत किंमत योजने अंतर्गत कापूस विक्री करता येणार नाही.

**नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे**

शेतकऱ्यांनी पवर नोंदणी करताना खालील कागदपत्रे अपलोड करावी लागतील

जमिनीची नोंद / मालकी दाखला

महसूल विभागाकडून प्रमाणित केलेला कापसाची पेरणी दाखला

**वैध आधार कार्ड**

हमीदराने कापूस विक्रीसाठी दिलेल्या मुख्य सूचना

* कापसाची ई-पीक पाहणी करणे आवश्यक
* सात-बारा नोंद करणे अनिवार्य
* खरेदीचे सर्व पेमेंट बँक खात्याला आधार लिंक करून केले जातील
* आधार कार्डला मोबाइल नंबर लिंक करणे आवश्यक

**पोस्टल बँक खात्यांसाठी पैसे स्वीकारण्याची मर्यादा वाढवलेली असणे आवश्यक**

'कपास किसान' पची सोय

सीसीआयने शेतकऱ्यांच्या सोयीसाठी मोबाईल प उपलब्ध करून दिले आहे.

सहज ऑनलाइन नोंदणी करू शकतात

कापसाची खरेदी प्रक्रिया सुरळीत पार पाडू शकते

**पेमेंट थेट बँक खात्यात मिळवू शकतात**

केंद्रीय कपूस निगमाचे 'कपास किसान' प शेतकऱ्यांसाठी ऑनलाइन नोंदणीसाठी सोयीचे व सुरक्षित माध्यम ठरत आहे. यंदा शेतकऱ्यांनी १ ते ३० सप्टेंबर दरम्यान नोंदणी करून हमीदरावर कापूस विक्रीची तयारी करणे अनिवार्य आहे.

**कपास किसान पची वैशिष्ट्ये**

ऑनलाइन नोंदणीची सुविधा

शेतकरी स्वतः च्या मोबाइलवरून कापस विक्रीसाठी ऑनलाइन नोंदणी करू शकतात.

नोंदणीसाठी जमीन नोंद, पेरणी दाखला आणि आधार कार्ड यांचा वापर केला जातो.

सुलभ व सुरक्षित प्रक्रिया

पवर शेतकऱ्यांची सर्व माहिती सुरक्षित ठेवली जाते.

आधार-लिंक बँक खात्याद्वारे पेमेंट थेट शेतकऱ्यांच्या खात्यात होते.

हमीदरावर कापस विक्रीस मार्गदर्शन

शेतकऱ्यांना हमीदरावर कापस विक्रीसाठी आवश्यक सूचना आणि अटी पवर उपलब्ध.

ई-पीक पाहणी, सात-बार नोंदणी आणि इतर महत्त्वाचे स्टेप्स पवर दाखवले जातात.

सुलभ पेमेंट सुविधा

पेमेंट थेट आधार लिंक बँक खात्यात मिळते, त्यामुळे व्यवहार जलद व सुरक्षित.

पोस्टल बँक खात्यांसाठी मर्यादा वाढवण्याचे पर्याय ॲपवर.

**डाऊनलोड आणि वापर सुलभ**

ॲप गुगल प्ले स्टोअर आणि पल स्टोरवरून उपलब्ध.

सोपी इंटरफेस, जे शेतकऱ्यांसाठी सहज समजण्यासारखे आहे.

पवर पूर्ण माहिती व मार्गदर्शन

नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे, अंतिम मुदत, दर माहिती, आणि संपर्क तपशील पवर उपलब्ध.

शेतकऱ्यांना संपूर्ण प्रक्रिया एकाच ठिकाणी पूर्ण करता येते.




विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

# 'श्री गणेशा आरोग्याचा' उपक्रमातून आतापर्यंत ३.२६ लाख नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी, ६,८६२ नागरिकांनी केले रक्तदान

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६ मुंबई** - गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कल्पनेतून राबविण्यात आलेल्या 'श्रीगणेशा आरोग्याचा' या विशेष उपक्रमाला राज्यभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. राज्यातील सर्वच जिल्ह्यांमध्ये २८ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर दरम्यान ७१५९ आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले. या शिबिरांतून तब्बल ३ लाख २६ हजार नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षाच्या पुढाकाराने आणि विविध आरोग्य संस्थांच्या सहकार्याने राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे लाखो नागरिकांपर्यंत मोफत आरोग्यसेवेचा लाभ पोहोचला.

तपासणीदरम्यान आजार आढळलेल्या ९,९६० रुग्णांना तज्ज्ञांकडे पुढील उपचाराकरिता पाठविण्यात आले. तसेच, नागरिकांनी मोठ्या संख्येने रक्तदान करून सामाजिक जबाबदारी पार पाडली असून ९५ रक्तदान शिबिरांतून एकूण ६,८६२ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

या अभियानात मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्ष, महात्मा फुले जन आरोग्य योजना, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, जिल्हा रुग्णालये तसेच धर्मादाय रुग्णालयांशी संलग्न तज्ज्ञ डॉक्टर व आरोग्य कर्मचारी यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. राज्यभरातील मोठ्या संख्येतील गणेश मंडळांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त सहकार्य करून लोकाभिमुख उपक्रम अधिक परिणामकारक करण्यास हातभार लावला.




२८ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर २०२५ दरम्यान 'श्रीगणेशा आरोग्याचा' अभियानात मोफत आरोग्यसेवा :

एकूण आरोग्य शिबिरे : ७,१५९

एकूण लाभार्थी रुग्ण : ३,२६,००१

एकूण पुरुष लाभार्थी : १,५६,५६०

एकूण महिला लाभार्थी : १,४१,१०८

लहान बालक लाभार्थी : २८,३३३

संदर्भित रुग्ण (पुढील उपचारासाठी पाठवलेले) : ९,६६०

एकूण रक्तदान शिबिरे : ९५

एकूण रक्तदाते : ६,८६२

महाराष्ट्रातील ३.२६ लाख नागरिकांनी मोफत आरोग्य तपासणीचा लाभ घेतला असून, ६,८६२ दात्यांनी रक्तदान करून समाजासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

जिल्हानिहाय सर्वाधिक योगदान

सर्वाधिक शिबिरे : सोलापूर - १२३६

सर्वाधिक रुग्ण तपासणी : सोलापूर - ६२,१८१

सर्वाधिक संदर्भित रुग्ण : पुणे -१५९९

सर्वाधिक रक्तसंकलन : पुणे - १६५०

बालकांचा सर्वाधिक सहभाग : पुणे - ७८५०

गणेशोत्सवासारख्या सणाच्या पार्श्वभूमीवर आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करणे ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची कल्पना प्रत्यक्ष उतरविण्यात आली. 'श्रीगणेशा आरोग्याचा' उपक्रमातून हजारो नागरिकांना त्यांच्या आरोग्याची मोफत तपासणी करण्याची संधी मिळाली. तपासणीदरम्यान आढळलेल्या रुग्णांना पुढील मोफत उपचारही दिले जाणार असल्याचे श्री. रामेश्वर नाईक, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष प्रमुख यांनी कळविले आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा  आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

Scan this QR code using the WhatsApp camera to join this group
क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

शनिवार दि. ६ सप्टेंबर २०२५ शहर/ग्रामिण

## अघोरी ‘उपचार’!

# मेळघाटात बालकावर अमानुष प्रकार, पोटावर दिले सळाखीचे चटके

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६मेळघाट–** सिमोरी गावाजवळ लहान बाळाच्या पोटावर उपचार म्हणून, लोखंडी सळाखीचे चटके देण्यात आल्याची चर्चा समाप्त झालेली नसताना, हरिसाल प्राथमिक आरोग्य केंद्रातील चोपन गावातील देवराज साकोम (३५ दिवस) च्या पोटोवर चटके देत म्हणजे, डम्मा देण्यात आल्याचे प्रकाशात येताच, पुन्हा मेळघाटातील अघोरी प्रथा आणि अमानवीय उपचाराचे दर्शन झाले आहे. आरोग्य व्यवस्था सध्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या आंदोलनामुळे पार ढासळली असल्याचा परिणाम समोर आला आहे.

धारणी पासून ४० कि मी अंतरावरअसलेल्या चोपन छोटाशा गावातील देवराज भीमराव साकोम (वय ३५ दिवस) बालकाच्या पोटावर डम्माचे चटके व – जखम दिसून आल्याने संबंधीत आरोग्य कर्मचाऱ्यांच्या पायाखालची जमीन सरकलेली दिसते. दर महिन्याला गावाला भेट देणाऱ्यांना महिनाभरानंतर हा बाळ दिसला होता. तडकाफडकी हरिसालप्राथमिक आरोग्य केंद्रात भरती करण्यात आले होते. प्राथमिक



उपचारानंतर धारणी उपजिल्हा रुग्णालयात रेफर करण्यात आले, त्यानंतर देवराजची प्रकृती बरी झाली.

माहितीनुसार देवराजला शौचास येत नसल्याचे बघून आईवडिलांनी भुमकाला दाखवले. आदिवासी परंपरेनुसार भुमका नाव सुकलालने पोटावर गरम सळाखीने चटके देण्याचा प्रयत्न केला. माहितीप्रमाणे पुरातन उपचार म्हणून मेळघाटात ही अंधश्रध्देची प्रथा प्रचलीत असून, अनेकबालके या प्रथेची बळी ठरलेली आहेत. आरोग्य यंत्रणेमार्फत अंधश्रध्देविरुध्द जनजागरण योग्य प्रमाणे होत नाही, किंवा प्राथमिक आरोग्य केंद्र व उप केंद्रातील कर्मचारी अथवा इतर स्थानिक कर्मचारी सेवा भावनेने काम करत नसल्याने नेहमी मेळघाटात अमानुष प्रकार घडतात. सध्या देवराजला आरोग्य लाभले असल्याने विषय संपल्यासारखा झाला आहे. मात्र प्रशासन,ग्राम स्तरावरील पदाधिकारीआजही मेळघाटात अंधश्रद्धेच्या नावाखाली उपचार केले जात असल्यामुळे कुपोषण वाढत आहे आणि अनेक बालमृत्यू होत आहेत. एकाबाजूला शासन कोट्यवधी रुपये खर्च करूनमेळघाटात आरोग्यसेवा उपलब्ध करून देत आहेत. अंगणवाडी सेविका, आशा वर्कर व आरोग्य विभागाचे कर्मचारी प्रामाणिकपणे कुपोषण व अंधश्रद्धा कमी करण्यासाठी आपले कार्य करताना दिसत आहेत तरीही मेळघाटसारख्या अतिदुर्गम भागातील गावांमध्ये आजही अंधश्रद्धेच्या नावाखाली भूमका, परिहार यांच्यामार्फत अघोरी उपचार केले जात आहेत.

## उद्याला दिसणार खग्रास चंद्रग्रहण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६अमरावती**

खंग्रास चंद्रग्रहण उद्या ७ सप्टेंबर २०२५ रोजी दिसणार आहे. हे चंद्रग्रहण संपूर्ण भारतातून दिसणार आहे. हे चंद्रग्रहण रात्री ९ वाजून ५७ मिनीटे ते १ वाजून २७ मिनीटापर्यंत दिसेल.चंद्रग्रहण घडून येण्यासाठी पौर्णिमेचा दिवस असावा लागतो. सूर्य, पृथ्वी, चंद्र या तिन्ही गोलांचे मध्य एका सरळ रेषेत आणि पातळीत असावे लागतात. चंद्र त्याच्या परिभ्रमण मार्गातून पृथ्वीच्या शंकूच्या आकाराच्या दाट सावलीतून जातो, त्यावेळी




तो पूर्णपणे दिसेनासा होतो. याला खग्रास चंद्रग्रहण असे म्हणतात. एका वर्षात कमीत कमी दोन आणि जास्तीत जास्त तीन चंद्रग्रहण होतात. दर अमावश्येला किंवा पौर्णिमेला ग्रहण लागत नाही, कारण चंद्राची भ्रमण पातळी आयनीक पातळीशी ५ अंक्षाचा कोन करते. त्यामूळे पौर्णिमेला किंवा अमावस्येला चंद्र आयनिक पातळीच्या उत्तरेला किंवा दक्षिणेला असू शकतो. त्यामुळे सूर्य, चंद्र, पृथ्वी एका रेषेत येऊ शकत नाही.सर्व खगोल प्रेमिंनी व जिज्ञासूंनी या विलोभनीय खगोलीय घटनेचे निरीक्षण करुन त्याचा आनंद घ्यावा, असे आवाहन मराठी विज्ञान परिषद, अमरावती विभागाचे अध्यक्ष प्रविण गुल्हाने, सचिव सुशिलदत्त बागडे व हौशी खगोल अभ्यासक विजय म. गिरुळकर यांनी केले आहे.

## बाप्पांच्या विसर्जनासाठी भाविकांमध्ये उत्साह, प्रशासन सज्ज

### आज घरगुतींसह शहरातील १५२ मंडळांच्या बाप्पांना निरोप





### सहा दिवसात ५९० मंडळाच्या गणपतींचे विसर्जन शहरात २००० वर पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती–** अमरावती शहरात गत दहा दिवस बाप्पांच्या आगमनानंतर नागरिकांमध्ये दररोज बाप्पांची आरती, महाप्रसाद, मिरवणूकी, शोभा यात्राची धूम होती. शनिवार ६ सप्टेंबर पासून बाप्पांच्या विसर्जनाला सुरूवात होणार असल्याने भाविकांमध्ये प्रचंड उत्साह आहे. शनिवारला पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीतील १५२ सार्वजनीक गणेशोत्सव मंडळाचे छत्री तलाव, प्रथमेश तलाव, वडाळी, कोंडेश्वर, अंजनगाव बारी सह विविध ठिकाणी विसर्जन होणार आहे. तसेच आगामी ५ दिवसात उर्वरित ४३८ मंडळांच्या गणपतींचे विसर्जन करणार आहेत. तर लालबागच्या राजाची शाही व भव्य मिरवणूक ११ सप्टेंबरला निघणार असल्याने विसर्जनाच्या सर्व दिवसांसाठी शहर पोलिस ताफा सज्ज झाला आहे. पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत यंदा दहा पोलिस ठाण्याच्या हद्दीत एकूण ५९० सार्वजनीक ठिकाणी गणपतींची स्थापना झाली. त्यापैकी पोलिसांनी दिलेल्या परवानगीनुसार ५ सप्टेंबरला ६ मंडळांनी विसर्जन मिरवणू काढून बाप्पांना निरोप दिला. यामध्ये भातकुली पोलिस ठाण्याच्या हद्दीतील १, गाडगेनगरमधील ४, नांदगावपेठ मधील १ या मंडळांचा समावेश होता.शनिवार ६ सप्टेंबर रोजी अनंत चुर्तथी असल्याने तब्बल १५२ लहान–मोठ्या मंडळांची विसर्जन मिरवणूक निघणार आहे.याअनुषंगाने, गणेश विसर्जन बंदोबस्ता–करीता पोलीस आयुक्तालय स्तरावर ०३ पोलीस उपायुक्त, ०४ सहा. पोलीस आयुक्त, २५ पोलीस निरीक्षक, ७० सपोनि /पोउपनि १३५० पोलीस अंमलदार, आरसीपी व क्युआरटी प्लॉटून, ०१ एसआरपीएफ कंपनीव १ प्लॉटूनसह ४०० + १०० पुरुष व महीला होमगार्डस् असा एकूण २०१० पोलिसांचा पोलीस बंदोबस्त नेमण्यात येणार आहे. तसेच, पो. ठाणेनिहाय शहरातील महत्वाचे चौक, गर्दीचे ठिकाणे, मिश्र व संवेदनशिल वस्तीच्या ठिकाणी फिक्स पॉईंट लावण्यात येणार आहे. नागरिकांचे सुरक्षेसाठी १४ सीआर मोबाईल, १० दामिनीपथके, बीटमार्शलवडायल ११२चीवाहने शहरात सतत पेट्रोलिंगसाठी राहणार आहेत.

## जिल्हाधिकारी कार्यालयात अनुकंपाच्या ४५ पदांसाठी रोजगार मेळावा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६ अमरावती–** जिल्हाधिकारी कार्यालयात अनुकंपा तत्त्वावरील ४५ पदांवर नियुक्ती देण्यासाठी आज रोजगार मेळावा पार पडला. मेळाव्याचे उद्घाटन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या हस्ते झाले.



यावेळी जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी अनुकंपा नियुक्ती ही शासनाची सहानुभूतीपूर्ण प्रक्रिया आहे. पात्र उमेदवारांना याचा निश्चितच लाभ मिळेल. अनुकंपा हा प्राधान्याचा असून हे प्रकरण संवेदनशीलपणे हाताळावे, अशा सूचना केल्या.

अनुकंपाधारकांच्या अडचणी जाणून शासन निर्णय काढला आहे. संपूर्ण राज्यामध्ये १५ सप्टेंबरपर्यंत ही प्रक्रिया राबविण्यात येत आहे. त्यानंतर अनुकंपाधारक व लोकसेवा आयोगामार्फत नियुक्ती झालेल्यांना नियुक्तीपत्र देण्यात येणार आहे. त्यामुळे उमेदवारांनी आवश्यक असलेल्या पदाचे ऑप्शन विचारपूर्वक द्यावे. रिक्त पदानुसार ही भरती प्रक्रिया होणार आहे.

त्यामुळे सर्व विभागप्रमुखांना १५ सप्टेंबर २०२५ पूर्वी नियुक्तीची कार्यवाही पूर्ण करण्याचे निर्देश दिले.मेळाव्यामध्ये गट–क सामाईक प्रतीक्षा यादीतील एकूण १५० उमेदवारांपैकी ११६ उमेदवार उपस्थित होते. या उमेदवारांकडून शासकीय सेवेत नियुक्तीसाठी पसंतीक्रम भरून घेण्यात आला.

विविध विभागांतील रिक्त असलेल्या एकूण ४५ पदांवर नियुक्ती देण्यासाठी हा मेळावा आयोजित करण्यात आला.अंतिम शिफारसपत्र प्राप्त उमेदवारांना संबंधित विभागांमार्फत एकत्रितपणे नियुक्तीपत्र देण्यासाठी १५ सप्टेंबर २०२५ रोजी नियोजन भवन येथे मेळावा घेण्यात येणार आहे. निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर यांनी प्रास्ताविक केले. यावेळी विविध विभागांतील अधिकारी, उमेदवार आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पोस्को गुन्ह्याचे २४ तासात तपास पूर्ण करुन दोषारोपपत्र दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती,**पोस्को गुन्हयातील प्रकरणाचा अवघ्या चोवीस तासात तपास पूर्ण करून दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे. गाडगेनगरचे ठाणेदार अतुल वर यांच्या नेतृत्वात पोलीसांनी सदर कार्यवाही केली आहे.

पोलीस स्टेशन गाडगेनगर येथे ४ तारखेला अल्पवयीन पिडीतेच्या आईच्या तक्रारी वरुन आरोपी नामे अजय राजकुमार गवई (४० वर्ष रा. वडाळी, प्रबुध्दनगर, अमरावती) याचे विरुध्द अपराध कलम ७५ भारतीय न्याय संहिता सहकलम ८/१२ बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक अधिनियम प्रमाणे दाखल करण्यात आला होता. या प्रकरणातील फिर्यादी ही ४ तारखेला दुपारी दीड वाजता त्यांचे अल्पवयीन मुलीसह अमरावती शहरातील बियाणी चौक येथे असलेल्या हॉटेल ओमीका येथे टिचर डे निमीत्त असलेल्या कार्यक्रमाला गेली होती. यावेळी फिर्यादी जेवण करीत असतांना त्यांची अल्पवयीन मुलगी ही हॅण्डवॉश करणे करीता वॉशरुम




मध्ये गेली होती. यावेळी हॉटेलमधील एका व्यक्तीने फिर्यादी यांची अल्पवयीन मुलीला बॅंडटच केले होते. मुलीनी ही बाब आईला सांगितली. त्यानंतर फिर्यादी व त्यांचे सोबत असलेल्या लोकांनी हॉटेल मधील सीसीटीव्ही कॅमेरे पाहीले असता सदरचा व्यक्ती हा हॉटेलमधील स्विपर अजय राजकुमार गवई हा असल्याचे खात्री झाली.यानंतर फिर्यादी यांनी पोलीस स्टेशन गाडगेनगर येथे येऊन फिर्यादी दिल्याने आरोपी विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. प्रकरणाचा तपास पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, उपायुक्त परीमंडळ १, सहाय्यक आयुक्त शिवाजी बचाटे, गाडगेनगरचे ठाणेदार अतुल वर, पोलीस निरीक्षक विजया पंधरे, समाधान वाठोरे यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि श्रीमती आरती गवई यांनी गुन्हा दाखल केला. तपास अधिकारी पोउपनि श्रीमती सुषमा आठवले यांनी गुन्ह्याचा तपास पोउपनि श्रीमती सोनाली सोनवणे, अंमलदार अमर तायडे, पोलीस स्टेशन गाडगेनगर यांचे सहकार्याने करण्यात आला. आरोपीस तात्काळ अटक करुन गुन्ह्याचा तपास २४ तासात पूर्ण करुन यातील आरोपीविरुध्द मा. विशेष सत्र न्यायालय अमरावती येथेदोषारोपपत्र पाठवण्यात आले.

## शिक्षक सन्मानाचा दिवस गेला; पुरस्कार वितरण आता ९ तारखेला

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६ अमरावती**

शिक्षक दिनीच शिक्षकांचा सन्मान होणे ही त्या शिक्षकांसाठी गौरवाची बाब असतानाही जिल्हा परिषदेत मात्र दरवर्षीच हा मुहुर्त काहीना काही कारणांमुळे टळतो. यंदाही शिक्षक पुरस्कारासाठी शिक्षक दिनाचा मुहूर्त मिळाला नाही. किमान शिक्षकदिनी निवड यादी जाहीर होणे अपेक्षित असताना मात्र निवड यादी विभागीय आयुक्तांकडे पडून असल्याने शिक्षकांकडून खंत व्यक्त होत आहे. दरवर्षी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडून जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार शिक्षकांना दिला जातो. यामध्ये तालुका स्तरावरून एक अशा १४ शिक्षकांची निवड केली जाते. तसेच माध्यमिक विभागाच्या एका शिक्षकांची देखील पुरस्कारासाठी निवड केली जाते. सन




२०२४–२५ करिताच्या जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी २६ प्रस्ताव दाखल झाले आहेत. प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने वर्ग व शाळा पडताळणी व मूल्यांकनाची प्रक्रिया २२ जुलै रोजी पूर्ण करण्यात आली आहे. त्यानंतर शिक्षकांच्या मुलाखती डायटचे प्राचार्य, गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी यांच्या समितीने घेतल्या. १४ शिक्षकांची ही निवड यादी मंजुरीसाठी विभागीय आयुक्तांकडे पाठवली होती. त्यामुळे यंदा तरी ५ सप्टेंबरला शिक्षकदिनी आदर्श पुरस्कार वितरीत होतील, अशी अपेक्षा सर्व शिक्षकांना होती. परंतु यंदाही या दिवसाचा मुहुर्त टळला. त्यामुळे आता ९ सप्टेंबरला विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, सीईओ व शिक्षण उपसंचालक यांच्या उपस्थितीत नियोजन भवन येथे पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे. परंतु शिक्षकदिनी किमान पुरस्कारार्थी शिक्षकांची घोषणा होणे अपेक्षित होते. परंतु ही निवड यादी अद्यापही विभागीय आयुक्तकार्यालयातच पडून असल्यानेशिक्षकांकडून खंत व्यक्त होत आहे.

## एनआयआरएफ द्वारा घोषित श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय देशभरातील अव्वल ९३ व्या स्थानी विराजमान

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती**

संपूर्ण देशभरात उच्च शिक्षणक्षेत्रात कार्यरत संस्थाची बहुप्रतिक्षित राष्ट्रीय मानांकन यादी नुकतीच केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने, नवी दिल्ली येथे पार पडलेल्या दिमाखदार सोहळ्यात घोषित करण्यात आली.

अमरावतीच्या श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयाने राष्ट्रीय पातळीवर पुन्हा एकदा आपली गुणवत्ता राखत प्रगती सध्या केली आहे. एनआयआरएफ रैंकिग २०२४ मध्ये महाविद्यालयाने भारतामधील अव्वल १०० मध्ये स्थान पटकावून गतवर्षी इतिहास घडविला होता.

देशपातळीवरप्राप्त केलेले ९९ वे मानांकन, आपल्या अतुलनीय कार्याच्या जोरावर यशोशिखराकडे आगेकूच करीत २०२५ वर्षाच्या मानांकन यादीत ९३ व्या स्थानावर महाविद्यालयाने झेप घेतली व विदर्भातून एकमेव महाविद्यालय म्हणून श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयाने आपली विजयी पताका आसमंतात फडकावली.

नॅशनल इन्स्टिट्यूशनल रैंकिग फ्रेमवर्क (एनआयआरएफ) प्रक्रियेत देशभरातील सर्वोत्तम १०० महाविद्यालयांमध्ये कोणत्या महाविद्यालयांची वर्णी लागते याकडे सबंध महाराष्ट्राचे लक्ष लागून होते.

अत्यंत गतिमान, अस्थिर



आणि महाविद्यालयांच्या सर्वंकष कार्याचे मूल्यमापनकरणारया या प्रक्रियेत स्वतः स्थान उंचावणे किवा टिकवून ठेवणे अत्यंत कठीण समजल्या जाते. अशातच श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीने राष्ट्रीय पातळीवर पुन्हा एकदा आपली गुणवत्ता राखत प्रगती सध्या केली आहे. एनआयआरएफ रैंकिग २०२४ मध्ये महाविद्यालयाने भारतामधील अव्वल १९९ मध्ये स्थान पटकावून गतवर्षी इतिहास घडविलाहोता.

देशपातळीवर प्राप्त केलेले ९९ वे मानांकन, आपल्या अतुलनीय कार्याच्या जोरावर यशोशिखराकडे आगेकूच करीत २०२५ वर्षाच्या मानांकन यादीत ९३ व्या स्थानावर महाविद्यालयाने झेप घेतली व विदर्भातून एकमेव महाविद्यालय म्हणून श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयाने आपली विजयी पताका आसमंतात फडकावली.विशेष म्हणजे, महाराष्ट्रातून केवळ तीन महाविद्यालयांना या अव्वल १०० च्या यादीत स्थान मिळाले असून, पुण्याचे फर्ग्यूसन आणि मुंबईचे झेवियर्स महाविद्यालयाच्या सोबत श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयाने आपला ठसा प्रभावीपणे उमटवला आहे. सलग चार वर्षे एनआयआरएफ रैंकिगमध्ये प्रगतीचा आलेख उंचावत ठेवणे ही महाविद्यालयाची ऐतिहासिक कामगिरी ठरली आहे. वेगवेगळ्या वर्गवारीत मानांकन प्राप्त करणाऱ्या ११ पैकी ८ संस्थाच्या कामगिरीत घसरण अनुभवणाऱ्या या यादीत चढता क्रम राखत शिवाजीने आपला स्वाभिमान जपला आहे. या प्रक्रियेत राष्ट्रीय स्तरावर शिक्षण, अध्यापन आणि संसाधने; संशोधन आणि व्यावसायिक प्रथा; पदवी परिणाम, प्रसार, पोहोच आणि समावेशकता तसेच प्रतिमा व धारणा या पाच निकषांवर महाविद्यालयांचे मानांकन करण्यात येते. ऐतिहासिक वारसा लाभलेल्या पुण्याच्या फग्र्युसन आणि मुंबईच्या झेवियर्स महाविद्यालयाच्या तुलनेत शैक्षणिक दृष्ट्या महत्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या शिक्षण, अध्यापन आणि संसाधने या निकषामध्ये श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयाने क्रमशः ५२.९३ आणि ५४.१७ या गुणांपेक्षा ६७.५० एवढे गुण प्राप्त करून विदर्भाच्या शिक्षण क्षेत्राचीमान उंचावली आहे.

# अंजनगाव तालुक्यातील करोडो रुपयांची गुंतवणूक पॉन्झी योजनेत

## पॉन्झी योजनेचे ग्रामीण भागातही जाळे

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अंजनगाव सुर्जी–** अंजनगाव सुर्जी तालुक्यात करोडो रुपये गुंतवणूक प्रकरण चांगलेच गाजत असून या प्रकरणाचे नवनवीन किस्से आता बाहेर येत आहे.अंजनगाव सुर्जी तालुक्यात गुंतवणूकदारांनी करोडो रुपयांची गुंतवणूक केली आहे या गुंतवणूकला पॉन्झी योजना असे म्हणतात. पॉन्झी योजना ह्या महाराष्ट्रात पुना मुंबई औरंगाबाद सारख्या भागात काम करत होत्या आता मात्र पॉन्झी योजना अंजनगाव तालुक्यातील ग्रामीण भागात सुद्धा पोहचल्या



असुन ह्या योजनेचे मास्टरमाईंड तालुक्यातील संत्रा व्यापारी व त्याचे संन्यास घेतलेले वडील आणि जवाई या त्रिमूर्तीनी या योजनेत मध्यमवर्गीय गुंतवणूकदारांना हेरुन पॉन्झी गुंतवणूक योजना सुरू केली आहे. अंजनगाव सुर्जी तालुक्यातील ग्रामीण भागात गुंतवणूकदारांनी मोठ्या प्रमाणात या पॉन्झी योजनेत करोडो रुपयांची गुंतवणूक केली आहे. तालुक्यातील पॉन्झी गुंतवणूक योजनेचा भांडाफोड त्रिमूर्तीनी कोटी रुपयांची मालमत्ता विकत घेतल्याने उघडकीस आला होता. तालुक्यातील मध्यमवर्गीय संत्रा व्यापाऱ्यांचे कुटुंब कोटी रुपयांचे व्यवहार करत असल्याची चर्चा तालुक्यात एक वर्षापासून सुरू होती त्यामुळे हे कुटुंब चांगलेच चर्चेत आले आहे. कोटी रुपयांचे व्यवहार आणि करोडो रुपयांची भाषा वापरुन पैशांचा उथळमाच हा संत्रा व्यापारी करत होता आता मात्र या संत्रा व्यापाऱ्यांचा व्यवहाराचा फुगा फुटल्याने या संत्रा व्यापाऱ्यांची चांगलीच फजिती झाली आहे.

### पॉन्झी योजना म्हणजे काय


पॉन्झी योजना म्हणजे गुंतवणूकदारांना कमी दिवसांत गुंतवणूकीवर उच्च परतावा मिळतो आणि तोच गुंतवणूकदार दोन तीन गुंतवणूकदारांना या योजनेची माहिती देतो. त्यामुळे या पॉन्झी गुंतवणूक योजनेत गुंतवणूकदारांची संख्या वाढतच जाते. पहिल्या गुंतवणूकदारांना कमी दिवसांत जास्त नफा मिळत राहतो.नविन गुंतवणूकदारांकडून गोळा केलेले पैसे आधिच्या गुंतवणूकदारांना परत दिले जातात असे चक्र सतत काही वर्षे चालू असते. जेव्हा नवीन गुंतवणूकदारांकडून येणारा पैशांचा प्रवाह कमी होतो तेव्हा योजना कोलमडते आणि गुंतवणूकदारांचे पैसे बुडतात.सुरवातीचे गुंतवणूकदार मात्र यात फायदेशीर ठरतात.याचाल पॉन्झी गुंतवणूक योजना म्हणतात

# टोकाचे पाऊल उचलू नका, सरकार यातून लवकरच मार्ग काढेल

### मुख्यमंत्र्यांनी कंत्राटदारांना दिला विश्वास

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६नागपूर :–** कंत्राटदारांची कोट्यवधीं ची देयके सरकारकडे थकीत आहेत. देयके रखडल्यामुळे त्रस्त झालेल्या दोन कंत्राटदारांनी आजवर आत्महत्या केली आहे. ही व्यथा मांडण्यासाठी कंत्राटदार गुरुवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीसाठी रामगिरीवर पोहोचले. कोट्यवधींचे बँकेचे व सावकारांचे कर्ज घेऊन आम्ही कामे केली. बिले थकली. आम्ही जगायचे कसे, अशी व्यथा मुख्यमंत्र्यांकडे मांडली. यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी लवकरच बिले देण्याची व्यवस्था केली जाईल, असे आश्वस्त केले.




पुढील आठवड्यात कंत्राटदार संघटनांची मुंबईत बैठक घेतली जाईल. थकीत देयके देण्यासाठी निधीची तरतूद केली जाईल. लहान कंत्राटदारांनाही दिलासा मिळेल. त्यामुळे कुणीही टोकाचे पाऊल उचलू नका, सरकार यातून लवकरच मार्ग काढेल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी कंत्राटदारांना दिला. कंत्राटदार संघटनेचे सुबोध सरोदे, संजय मैंद, नितीन साळवे, कृष्णा हिंदुस्तानी, पराग मुंजे, दिपेश पोकुलवार, आमधरे, श्रीकांत कापसे, अभिषेक गुप्ता, रुपेश रणदिवे, सतीश निकम, वर्गिस, पीयूष मुसळे, अमित भोयर, अनिल इखनकर, राकेश अस्ती, संजय गिलुरकर आदींनी मुख्यमंत्र्यांसमोर वास्तविकता मांडली.

महाराष्ट्रातील सार्वजनिक बांधकाम विभाग, ग्रामविकास विभाग, जलजीवन मिशन अंतर्गत जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभाग, जलसंधारण व जलसंपदा विभाग, नगर विकास विभाग इत्यादी विभागातील अंदाजे ९० हजार कोटींची देयके प्रलंबित आहेत. याकरिता संपूर्ण महाराष्ट्रात गेल्या वर्षभरापासून धरणे आंदोलन, मोर्चा, लाक्षणिक उपोषण करण्यात येत आहे, परंतु शासनातर्फे सकारात्मक प्रतिसाद मिळाला नाही. याबाबत फक्त संबंधित विभागाचे सचिव, संबंधित मंत्री यांच्याकडून फक्त कोरडे आश्वासन दिले जात आहे. सांगली येथील कंत्राटदार अभियंता बंधू हर्षल पाटील यांनी प्रलंबित देयकांचे भुगतान न झाल्यामुळे आपले जीवन संपविले.

# जि.प. – पं.स. निवडणुकांमध्ये चक्रानुक्रमानुसार आरक्षण लागू

## मुख्यमंत्री फडणवीस यांची स्पष्टोक्ती

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६ वरूड,** आगामी होणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आरक्षणाच्या मुद्यावरून निर्माण झालेल्या गोंधळाला अखेर तोडगा निघाला आहे. सर्वोच्च न्यायालया च्या आदेशानुसार शासनाने काढलेल्या परिपत्रका नुसार चक्रानुक्रमानुसार आरक्षण लागू करूनच या निवडणुका घेण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.नागपूर येथे झालेल्या बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस यांनी माजी जिल्हा परिषद सदस्य शरद मोहोड, अमरावती जिल्हा अनुसूचित जाती जमाती महामंत्री रुपेश ढोले, जामगाव सेवा सहकारी सोसायटीचे संचालक विलास पाटील, तसेच विशाल



भोजने यांच्याशी निवडणुकांच्या तयारीविषयी सविस्तर चर्चा केली.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की,चक्रानुक्रमानुसार आरक्षण लागू होत असल्याने अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती तसेच ओबीसी समाजावर कोणत्याही प्रकारचा अन्याय होणार नाही. मात्र कोणत्या समाजाला कोणत्या जागा मिळतील हे आरक्षणाचा तक्ता जाहीर झाल्यावरच स्पष्ट होईल.

सध्या राज्यभरात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांचे पडघम वाजत असून, आरक्षणाच्या आराखड्याविषयी उत्सुकता आहे. आरक्षणाचा तक्ता जाहीर होईपर्यंत राजकीय गणिते व उमेदवारी संदर्भातील चर्चांना गती मिळणार आहे.राज्यातील सर्वच राजकीय पक्षांनी या निवडणुकीकडे लक्ष केंद्रित केले असून, स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सत्तेची समीकरणे ठरवणाऱ्या या निवडणुका अत्यंत महत्त्वाच्या ठरणार आहेत.

# जरूड हायस्कूलच्या कन्यांचा जिल्हास्तरीय झंकार राष्ट्रीय विज्ञान नाट्योत्सवासाठी निवड

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६वरूड,**

गावाकडच्या मुली आज विज्ञानाच्या रंगमंचावर आपला ठसा उमटवत आहेत आणि त्यांचा आत्मविश्वास संपूर्ण समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे. श्री. शिवाजी शिक्षण संस्था अमरावती संचालित जरूड हायस्कूल, जरूडच्या विद्यार्थिनींनी आपल्या कष्ट, जिद्द आणि प्रतिभेच्या जोरावर विज्ञान नाट्योत्सवात भव्य यश मिळवले आहे.

राज्य विज्ञान शिक्षण संस्था, नागपूर व वरूड तालुका विज्ञान अध्यापक मंडळ, वरूड यांच्या संयुक्त विद्यमाने स्कूल ऑफ स्कॉलर्स, वरूड येथे झालेल्या तालुका स्तरीय विज्ञान नाट्योत्सव स्पर्धेत जरूड हायस्कूलच्या मुलींनी प्रथम क्रमांक पटकावत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. या विजयामुळे त्यांची राष्ट्रीय विज्ञान नाट्योत्सव स्पर्धा २०२५ साठी जिल्हास्तरावर निवड झाली असून, हा क्षण गाव, शाळा आणि पालकांसाठी अभिमानाचा ठरला आहे.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात तालुका विज्ञान अध्यापक मंडळ अध्यक्षा सौ. नंदिणी राजेश ठाकरे यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाला एस.ओ.एस.चे मुख्याध्यापक श्री. दुबे अध्यक्षस्थानी होते. तर माजी मुख्याध्यापक श्री. दिलीप



देशपाडे व श्री. दामोधरजी गोडबोले यांनीही विद्यार्थिनींना प्रोत्साहन दिले.या स्पर्धेत चमक दाखवणाऱ्या प्रतिभावान विद्यार्थिनींमध्ये कु. पूर्वी लांडगे, लावण्या चोबीतकर, देवयानी काळे, अमृता सोनुले, मृणाली तायवाडे, खुषी झोडे, श्रावणी गावंडे, हर्षिका तायवाडे यांचा समावेश असून, त्यांच्या या प्रवासामध्ये विज्ञान शिक्षिका कु. स्नेहल मावंदे तसेच शिक्षक देवेंद्र खेरडे व रोहण पांडे यांचे अथक मार्गदर्शन लाभले.या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा. हर्षवर्धनजी देशमुख, सदस्य सुभाषराव बन्सोड, आजीवन सभासद पंजाबराव माकोडे, मनोहरराव श्रीरसागर, गुलाबराव पाचघरे, माजी सचिव शेषरावजी खाडे, मुख्याध्यापक ओमप्रकाश दुपारे तसेच सर्व शिक्षक–शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थिनींचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

गावातील या मुलींनी दाखवलेले यश हे केवळ शाळेपुरते मर्यादित नाही, तर पालकांचा अभिमान, शिक्षकांचा सन्मान आणि समाजाचा विश्वास यांचीही प्रचिती देणारे आहे. ग्रामीण भागातील या कन्यांनी सिद्ध केले की संधी मिळाली तर खेड्यातील प्रतिभा देखील विज्ञानाच्या रंगमंचावर राष्ट्रीय स्तरावर झळकू शकते.

# नागपूर विधानसभा प्रभारीपदी किशोर बोरकर यांची नियुक्ती

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती–** महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस किशोर बोरकर यांची नागपूर उत्तर विधानसभेच्या प्रभारी पदावर नियुक्ती केली आहे. किशोर बोरकर हे गेल्या २५ ते ३० वर्षांपासून सलग काँग्रेस पक्षाच्या विविध पदावरून पक्षाचे सातत्याने कार्य करीत आहेत. काँग्रेस पक्षाच्या कार्याचा दिर्घ अनुभव असल्यामुळे, येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर किशोर बोरकर यांची उत्तर नागपूर विधानसभेच्या प्रभारी पदावर नियुक्ती करण्यात



आलेली आहे. केंद्रात व राज्यात भाजपाचे सरकार असताना किशोर बोरकर यांनी अमरावती शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या अध्यक्ष पदावरून आंदोलने करून काँग्रेस पक्षाकडे जनतेचे लक्ष वेधून घेतले होते. पक्षापासून दुर गेलेल्या कार्यकर्त्यांना सन्मानाने पुन्हा पक्षात सक्रिय केले होते. राहुल नगर बिच्छु टेकडी प्रभागाचे प्रतिनिधीत्व करीत त्यांनी महानगरपालिकेत शिक्षण सभापती पदावरकार्य केले आहे.

# चांदूर रेल्वे येथे काझीपुरा परिसरामध्ये ईद ए मिलादुन्नबीनिमित्त मिरवणूक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६चांदुर रेल्वे–** शहरातील काझीपुरा परिसरात शुक्रवारी ५ सप्टेंबरला इंद मिलादुन्नबी निमित्त मुस्लिम समुदायाने मिरवणूक काढली. मिरवणुकीत मुले हातात आकर्षक झेंडे घेऊन पुढे चालत होते. रंगीबेरंगी झेड्यांनी सजवलेल्या मार्गावरील मुलांचा गट मिरवणुकीचे मुख्य आकर्षण होता. काझीपुराचा मिरवणुकीचा मार्ग सजावटीच्या झेंड्यांनी सजवण्यात आला होता. पारंपारिक घोषणा व झेंडे फडकवत वातावरण चैतन्यशील बनले. यावेळी धार्मिक सौहार्दाचा संदेश देत, मिरवणुकीत शरबत, मिठाई वाटप केली. शुक्रवारच्या नमाजानंतर सामुदायिक लंगर आयोजित केला होता, ज्यामध्ये समाज बांधवांनी भोजन केले, मिरवणूक शांततेत व्हावी यासाठी पोलिस प्रशासनाने कडेकोट बंदोबस्त ठेवला होता. पोलिस अधिकारी मार्गावर गस्त घालत होते. शहरातील मुख्य चौक आणि चौकांवर जवान तैनात केले होते. या वेळी पीएसआय नंदलाल लिंगोट, पीएसआय नितेश आझडे,कर्मचारी प्रशांत



ढोके, प्रदीप पाटील आणि इतर कर्मचाऱ्यांचा कडक पोलिस बंदोबस्त होता. या वेळी काजीपुरा येथील इस्माईल कुरेशी, अनिस सौदागर, सैब्यद जाकीर, नुरुलहसन कुरेशी, गफ्फार शेख, साजिद जानवानी, शेख नियामत, समीर जानवानी, शब्बर खान, तौफिक बेग, शेख शाकीर, शहेजाद सौदागर, मुस्ताक सौदागर, हारूण शहा, सुभान शहा, अजिज सौदागर, इशाक सौदागर, अकीलभाई, जावेद पठाण, सलीमभाई, शेख सरदार,शोएब मिझां, शेख राहील, शेखा सत्तार, जमील कुरेशी, शेख अकबर, यासीन मिहर्ग, शोएब कुरेशी, आवेश कुरेशी यांच्यासह समाजबांधव उपस्थित होते.बंधुत्वाचा संदेश काझीपुराची ही मिरवणूक केवळ धार्मिक उत्सव नसून सामाजिक सौहार्द आणि बंधुत्वाचे प्रतीक असल्याचे सिद्ध झाले. या कार्यक्रमात मुले, तरुण आणि वृद्धांसह सर्व वर्गातील लोकांनी सहभाग घेतला. संपूर्ण शहरात एकता, प्रेम आणि परस्पर बंधुत्वाचा संदेश दिला.

धारणीत गणेश विसर्जन मिरवणुकीवर

# चौकाचौकात मल्टी अँगल सीसीटीव्हीची नजर

**विदर्भ प्रजासत्ताकदि.६धारणी–** धारणी शहरात शांतता सुव्यवस्था अबाधित राहून गणेश विसर्जनासह सर्वच सण निर्विघ्न साजरे करण्यासाठी शहरातील अनेक चौकात मल्टि अँगल हायडेन्सिटीचे कॅमेरे लावून



धारणी नगर पंचायतने एक प्रशंसनीय कार्य केलेले आहे.पो.नि. अवतार सिंह चव्हाण यांनी दर्शविलेल्या चौकातविशेषकॅमेरे लावूनविसर्जन मिरवणुकीवरनजर ठेवण्यात येईल, हे विशेष. धारणी पोलिस तथा नगर पंचायतचे मुख्याधिकारी विजय लोहकरे यांनी बैठकीत चर्चा करून शहरातील प्रमुख ठिकाणनिश्चित केले. त्यानंतर बुधवार आणि गुरुवारला चौकाचौकात सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले आहे. जयस्तंभ चौक, होली चौक, चर्च चौक, बसस्थानकासमोर नप. चे शे. अमीन यांनी स्वतः हजर राहून नवीन कॅमेरे लावून घेतले.न.प.ने आपल्या निधीतून कॅमेरे खरेदी करून पोलिस प्रशासनाला सहकार्य केले आहे. कॅमेऱ्याच्या माध्यमाने लाईव्ह निगरानी विसर्जनावर करणे प्रथमच शक्य झाले आहे. धारणी परीसरात शनिवारपासून गणेश विसर्जनाची सुरुवात होत आहे.

# स्व. शरद जोशी यांची ९० वी जयंती शहीद स्मारक नेकनानपुर येथे संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६चांदूर रेल्वे –**

अमरावती जिल्हा शेतकरी संघटनेच्या वतीने ३ सप्टेंबरला युगात्मा स्व. शरद जोशी यांची जयंती शहीद स्मारक नेकनानपुर, ता. चांदूर रेल्वे येथे संपन्न झाली.

शेतकरी संघटनेच्या आंदोलनात तीन शेतकरी पुत्र शहीद झाले होते, त्यांचे स्मृती प्रित्यर्थ उभारण्यात आलेल्या शहीद स्मारक, नेकनानपुर येथे शेतकरी संघटनेचे विदर्भाध्यक्ष राजाभाऊ उर्फ श्रीकांत पाटील पुसदेकर यांचे अध्यक्षतेखाली तसेच जिल्हाध्यक्ष माधवराव गावंडे, शेतकरी संघटना व विदर्भ राज्यआंदोलन समितीचे जिल्हाध्यक्ष राजा आगरकर, हुतात्मा शहीद प्रकाश काळे यांच्या मातोश्री अनुसया काळे यांचे प्रमुख उपस्थितीत सदर जयंतीचा



कार्यक्रम साजरा करण्यात आला. प्रथमतः हुतात्म्यांना विनम्र अभिवादन करून स्व. शरद जोशी यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करून या कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. शरद जोशी यांच्या जीवनावर अनेक पैलूंनी प्रकाश टाकत उपस्थित वक्त्यांनी आपले विचार मांडले.

यावेळी संघटनेचे अमरावती जिल्हाध्यक्ष माधवराव गावंडे, राजा आगरकर, अंजनगाव तालुका शेतकरी संघटनेचे अध्यक्ष संजय हाडोळे, अंजनगाव तालुकास्वतंत्र भारत पक्षाचे अध्यक्ष गजानन पाटील दुधाट, शहीद स्मारक समितीचे प्रमुख शिवाजीराव चौधरी, जिल्हा उपाध्यक्ष सुनील पाटील साबळे, विभागीय अध्यक्ष अशोक हांडे, समन्वय समिती प्रमुख प्रा. शरदराव पुसदकर यांनी आपल्या वक्तव्यातून शरद जोशी यांच्या जीवनाचा आढावा घेतला. संघटनेचे माजी जिल्हाध्यक्ष दिनकरराव निस्ताने यांनी प्रास्ताविक केले.

सूत्रसंचालन शेतकरी संघटनेचे धामणगाव तालुका अध्यक्ष प्रा. दिवाकर राऊत यांनी केले. अध्यक्षीय भाषणात विदर्भ अध्यक्ष राजाभाऊ पाटील पूसदेकर यांनी शरद जोशी यांनी शेतकऱ्यांसाठी बांधलेली चळवळ, केलेली आंदोलने, जेलभरो, रस्ता रोको, रेल रोको, दिल्ली येथे संसद भवनावर केलेली आंदोलने, मुंबईला विधानसभेवरकेलेली आंदोलने व शरद जोशींनी शेतकऱ्यांसाठी खर्ची घातलेले संपूर्ण जीवन आपल्या अध्यक्षीय भाषणातून विषद केले.

याप्रसंगी तालुक्यातून आलेले शेतकरी संघटनेचे देविदास पाटील ढोक, किशोर पाटील काळमेघ, ज्ञानेश्वर वानखडे, धनराज गोटे, ज्ञानेश्वर टिपरे, तालुकाध्यक्ष सुधाकर थेटे, युवाआघाडी सुशील कचवे, बाबाराव जाधव, रणजीत राऊत, महेंद्र गावंडे, सागर गावंडे, धनराज फरकाडे, संतोष दहेकर, पवन भालेराव, पुरुषोत्तम मारोटकर, जीवन पंचगाडे, अनिल गावंडे, अनिल झाडे, नारायण सिरस्कार, रामेश्वर काळे, श्रीकांत सावंत, अरुण लोखंडे, मुरलीधर रिठे, धनराज मोहोळ, अशोकराव वानखडे, देविदास काळे व बहुसंख्य शेतकरी उपस्थित होते.

# रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे पदाधिकारी जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती –** रिपाइंचे राष्ट्रीय सरचिटणीस डॉ.राजेंद्र गवई यांच्या आदेशानुसार पक्षाचे महाराष्ट्र राज्य निवडणूक अधिकारी डॉ. गौतम गोसावी यांनी राज्यभरातील विविध जिल्ह्यातील जिल्हाध्यक्ष, शहराध्यक्ष व पदाधिकारी गुरुवारी (ता. ४) जाहीर केले आहेत. पक्ष संघटन बळकट करण्यासाठी या नियुक्त्या महत्त्वपूर्ण ठरणार आहेत. या नियुक्त्यांमुळे पक्ष कार्यकर्त्यांना नवसंजीवनी मिळून मिळून संघटन अधिक सक्षम होईल, असा विश्वास डॉ. गौतम गोसावी यांनी व्यक्त केला आहे.

घोषित जिल्हानिहाय पदाधिकारी नागपूर अध्यक्ष सुधीर निगराव शंभरकर, शहर अध्यक्ष रविंद्र विलासराव सवाईतुल, कार्याध्यक्ष क्षितिज पंचम गायकवाड, अमरावती जिल्हा अध्यक्ष हिम्मत ढोले, शहर अध्यक्ष निर्मल सरदार,



कार्याध्यक्ष चंक्रार शांतुस्कर, जिल्हा वकील संघ अध्यक्ष ॲड. उमेश इंगळे, सचिव सागर गवई, महासचिव शहर अतिश डोंगरे, प्रवक्ता (विदर्भ) साहेबराव य. भालेराव, यवतमाळ जिल्हाध्यक्ष राहुल सोनोने, चंद्रपूर जिल्हाध्यक्ष मोरेश्वर चंदनखेडे, हिंगोलीजिल्हाध्यक्ष चंद्रमुर्ती मधुकर गडचिरोली मांजरमकर, जिल्हाध्यक्ष मुनेश्वर बोरकर, ठाणे जिल्हाध्यक्ष सुर्यकांत वाघमारे, सातारा जिल कोल्हापूर जिल्हाध्यक्ष पांडूरंग कांबळे, सोलापूर जिल्हाध्यक्ष वैभव घाईन्जे, धाराशिवं (उस्मानाबाद) : जिल्हाध्यक्ष अशोक लोडे, लातूर जिल्हाध्यक्ष संभाजी कांबळे, बीड जिल्हाध्यक्ष बाळासाहेब काकडे, नादेड जिल्हाध्यक्ष भगवान ढंगे, परभणी जिल्हाध्यक्षः नारायण वाघमारे, संभाजीनगर (औरंगाबाद) जिल्हाध्यक्ष अमोल मगरे, वर्धा जिल्हाध्यक्ष नरेंद्र पाटील, उपाध्यक्ष मोरेश्वर नगराळे, अकोला जिल्हाध्यक्ष राघवकुमार इंगळे.

# मतचोरीचा आरोप उलटा कॉंग्रेसवरच

## बावनकुळेंचा सवाल, जिथे पदयात्रा तिथेच मताधिक्य?



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६नागपूर**

कॉंग्रेसने मतचोरीचा आरोप भाजपवर करताना त्यांची सुरुवात कामठी विधानसभा मतदार संघातून चंद्रशेखर बावनकुळे यांनी केल्याचा आरोप कामठीत झालेल्या राज्यस्तरीय मेळाव्यात केला होता. कॉंग्रेसने कामठीत ज्या भागातून पदयात्रा काढली, त्या भागात विधानसभा निवडणुकीत सर्वाधिक मतदान कॉंग्रेसलाच झाले आहे यावरून मतचोरी कोणी केली हे स्पष्ट होते, अशा शब्दांत पालकमंत्री बावनकुळे यांनी कॉंग्रेसला प्रतिउत्तर दिले. ते शुक्रवारी नागपुरात माध्यम प्रतिनिधींशी बोलत होते.

कॉंग्रेसने कामठी येथे 'वोट चोर गद्दी छोड' राज्यस्तरीय निधेष मेळावा बुधवारी आयोजित केला होता. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते कृषी उत्पन्न बाजार समितीपर्यंत पदयात्रा काढण्यात आली होती. या मेळाव्यात बावनकुळे यांच्यावर कॉंग्रेसने मतचोरी'च्या मुद्यावर हल्लाबोल केला. मतचोरीचा मॉडेल सर्वप्रथ कामठीत राबवण्यात आले,. त्यानंतर महाराष्ट्रातील इतर ठिकाणी हा प्रयोग करण्यात आला, असा आरोप करण्यात आला होता. त्याला प्रतिउत्तर देताना बावनकुळे म्हणाले, कॉंग्रेसची पदयात्रा कामठीत ज्या भागातून काढली. त्या भागातील बूथवर कॉंग्रेसला सर्वाधिक मते मिळाली, त्यावर कोणी मतचोरी केली हे स्पष्ट झाले आहे, असेही बावनकुळे म्हणाले.

कुठल्याही समाजाचे आरक्षण काढून ते दुसऱ्या समाजाला दिले जाणार नाही. काही जण सामाजिक सलोखा बिघडवत असून संभ्रम निर्माण करीत आहे. ज्यांच्याकडे कुणबी नोंद असेल त्यांनाच जातीचे प्रमाणपत्र मिळणार आहे. पुरावे नसल्यास प्रमाणपत्र मिळणार नाही. फक्त नोदणी शोधली म्हणून त्यावर प्रमाणपत्र देणार नाही, अधिकारी हे नियमाप्रमाणेच सही करतील, कुठलेही कास्ट सर्टिफिकेट चॅलेंज होऊ शकतो. त्यामुळे ओबीसींनी संभ्रमित होऊ नये, असे बावनकुळे म्हणाले.छगन भुजबळ नाराज नाही. त्यांचा काही आक्षेप असेल तर तो दूर करू, कुठल्या वाक्याबद्दल संभ्रम असेल तर त्यावर चर्चा करू, असे त्यांनी स्पष्ट केले. मंत्रिमंडळाच्या उपसमितीत कुणबी मंत्री नाही याबाबत बोलताना बावनकुळे म्हणाले, ही कॅबिनेटची समिती आहे. यात तिन्ही पक्षाचे मंत्रीआहे. कॅबिनेट मंत्री असा शब्द असल्याने तेच या समितीत राहील, विदर्भात कुठल्याही समाजाचा असला तरी सर्व एका दिलाने काम करतात.

# राष्ट्रीय ओबीसी महासंघात फूट, कॉंग्रेस नेत्यांची वेगळी चूल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६नागपूर**

मनोज जरांगे यांच्या मागणीच्या विरोधात नागपुरातील संविधान चौकात साखळी उपोषण करणाऱ्या राष्ट्रीय ओबीसी महासंघात फूट पडली असून . प्रारंभी या महासंघाला समर्थन देणारे विविध संघटनांचे नेते आणि कॉंग्रेस पक्षाच्या नेत्यांनी वेगळी चूल मांडली आहे.



राष्ट्रीय ओबीसी महासंघ विधानसभा निवडणुकीपासून भाजपच्या जवळ गेल्याची भावना समाजात आहे. त्यामुळे या महासंघातील अनेक पदाधिकाऱ्यांनी साखळी उपोषणापासून फारकत घेतली होती. तसेच कॉंग्रेस नेते आणि विविध संघटनांना देखील महासंघ भाजपची जवळीक साधून असल्याचा आरोप करत आहेत. विविध संघटना, कॉंग्रेस नेत्यांनी महासंघाच्या गोव्यातील अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सहभागी झाल्यानंतर महासंघाबाबत संशय घेण्यास सुरुवात केली होती. त्याची प्रचिती आंदोलन देखील दिसून आली होती. २०२३ मध्ये राष्ट्रीय ओबीसी महासंघाने केलेल्या आंदोलनात कॉंग्रेस नेत्यांचा सहभाग होता. २०२५ च्या आंदोलनात कॉंग्रेस अंतर राखून होती.

राज्य सरकारने हैदराबाद गॅझेटच्या आधारे मराठा समाजाला जातप्रमाण देण्याची घोषणा केल्यानंतर तर महासंघावर नाराज नेत्यांनी वेगळी भूमिका मांडण्यास सुरुवात केली. आता तर कॉंग्रेस नेते विजय वडेट्टीवार, ओबीसी अधिकार युवा मंचचे मुख्य संयोजक उमेश कोराम आणि इतर संघटनांच्या नेत्यांनी उद्या, शनिवारला रविभवन येथे ओबीसी समाजातील प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक बोलावली आहे. त्यावरून ओबीसी समाजात फूट पडल्याचे आणि वडेट्टीवार यांच्या नेतृत्वाखाली ओबीसी समाजाने वेगळी चूल मांडल्याचे दिसून येत आहे.

जरांगे पाटील यांनी मराठा, कुणबी हे सर्व ओबीसी असल्याचे सांगून मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देण्याच्या मागणीसाठी मुंबईत आझाद मैदानावर उपोषण सुरू केले. तर मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण दिले जाऊ नये म्हणून राष्ट्रीय ओबीसी महासंघाने नागपुरातील संविधान चौकात साखळी उपोषण सुरू केले आहे.

# काटपूर येथे ढोल-ताशांच्या गजरात गणरायाला निरोप



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६काटपुर**

तालुक्यातील काटपूर मोर्शी ममदापूर येथे शुक्रवारला ढोल-ताशांच्या गजरात भव्य मिरवणूक काढून गणरायाला निरोप देण्यात आला. सर्वप्रथम गावातील मानाचा गणपती असलेला मंगेश जपुलकर यांच्याकडील गणपतीची मिरवणूक बसस्टॅन्डवरून काढण्यात आली. गावात ठिकठिकाणी गणपतीचे अभीर व गुलालाने स्वागत करण्यात आले. या मानाच्या गणपतीची मिरवणूक संपूर्ण गावातून फिरवून काशी नदीवर विसर्जन करण्यात आले.

यानंतर गावातील पाचही मंडळाच्या गणपतीची भव्य मिरवणूक मंडळाच्या सर्व कार्यकर्त्यांकडून काढण्यात आली. यावेळी ढोल-ताशे व डीजेच्या तालावर तरुणाईने बेधुंद होऊन मनमुराद आनंद लुटला. यामध्ये न्यू आझाद गणेश उत्सव मंडळ ममदापूर, शिवशक्ती गणेश उत्सव मंडळ ममदापूर, श्री शिवाजी बाल विकास गणेश उत्सव मंडळ ममदापूर, जय किसान गणेशउत्सव मंडळ काटपूर, न्यू गणेश मंडळ काटपूरच्या सर्व कार्यकर्त्यांनी मोठ्या धुमधडाक्यात गणपती बाप्पाची भव्य विसर्जन मिरवणूक काढून अखेरचा निरोप दिला. यावेळी शिरखेड पोलिसस्टेशनतर्फे विसर्जन मिरवणुकीमध्ये भव्य बंदोबस्त लावण्यात आला होता. ठाणेदार सचिन लुले यांच्या मार्गदर्शनात बीट जमादार किसन धुर्वे, पोलिसपाटील रवींद्र यावले यांनी मिरवणूक यशस्वी करण्याकरिता परिश्रम घेतले.

# वाघाच्या हल्ल्यात मृत्यू पावलेल्याच्या कुटूंबियांना पाच लाखांची मदत

## आ. केवलराम काळे यांनी कुटुंबाला दिला आधार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६शिंदी बु.**

राजदेवबाबा कॅम्प परिसरात गस्तीवर असताना वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झालेल्या प्रेम मुन्ना कास्देकर (३०) रा. तारुबंदा यांच्या कुटुंबाची भेट घेऊन आ. केवलराम काळे यांनी त्यांना धीर दिला. या भेटीत वनविभागाकडून मृतकाच्या पत्नी निर्मला कास्देकर यांना पाच लाख रुपयांचा धनादेश प्रदान करण्यात आला. त्याचबरोबर आ. काळे यांनी वैयक्तिक स्तरावरूनही आर्थिक मदत करून सहानुभूती व्यक्त केली.

प्रेम कास्देकर यांचा मृत्यू झाल्याने तारुबंदा गावात शोककळा पसरली आहे. अचानक घडलेल्या या घटनेमुळे स्थानिकांमध्ये भीतीचे वातावरण असून, गावकरी मोठ्या संख्येने एकत्र जमले होते. कुटुंबातील प्रमुख व्यक्तीचा मृत्यू झाल्याने त्यांच्या पत्नी व लहान मुलांवर मोठे संकट कोसळले आहे.

घटनास्थळी पाहणी केल्यानंतर आ. काळे यांनी या दुर्घटनेबाबत गंभीर भूमिका घेतली. 'गावकऱ्यांचे प्राण धोक्यात घालणाऱ्या नरभक्षी वाघाला तत्काळ जेरबंद करण्यात यावे, असे निर्देश देत त्यांनी राज्याचे वनमंत्री यांना याबाबत पत्र पाठविल्याचे सांगितले, तसेच या दुर्घटनेत दोषींवर कठोर कारवाई करण्याचे आदेशही दिले.

यावेळी सहायक उपवनसंरक्षक प्राची उरले, वनपरिक्षेत्र अधिकारी राहुल धाईत, राजेंद्र महल्ले, ठाणेदार अवतारसिंग चव्हाण, झाल्टे, हंकारे, मानद वन्यजीव रक्षक जयंत वडतकर तसेच वनविभागातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. गावकऱ्यांनीही आपली व्यथा आमदारांसमोर मांडली.आ. काळे यांनी गावकऱ्यांना आश्वासन दिले की, 'वनविभागाने पुढील काळात आक्रमक पावले उचलून अशा घटना टाळाव्यात, नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य द्यावे, असे स्पष्ट करत त्यांनी प्रशासनाला जबाबदारीची जाणीव करून दिली. वन्यजिवांच्या हल्ल्यामुळे होणाऱ्या मृत्यूंवर नियंत्रण आणण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्या लागतील, अशी भावना गावकऱ्यांनी व्यक्त केली.

# झेडपीच्या २२ माध्यमिक शाळांमध्ये आता 'गप्पा विथ सीईओ'

## दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांकरिता सीईओंचा उपक्रम; विचार मांडण्यासाठी मुक्त व्यासपीठ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

जिल्हापरिषद शिक्षण विभागामार्फत जिल्ह्यातील माध्यमिक शाळांनध्ये गप्पा विथ सीईओ हा नाविन्यपूर्ण उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत जिल्हा परिषदेच्या २२ माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील इयत्ता १०वी व १२ वीचे विद्यार्थी सहभागी होणार आहेत. यामध्ये सीईओ महिन्यातून दोन शनिवारी शाळेला भेट देऊन विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधणार आहे.मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता मोहपात्रा यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमांचा उद्देश विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन, मानसिक आरोग्य जागरुकता, शैक्षणिक समस्या निराकरण तसेच विद्यार्थ्यांच्या दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांकरिता सीईओंचा उपक्रमविचार मांडण्यासाठी मुक्त व्यासपीठशंका व प्रश्न खुले वातावरणात सोडविणे हा आहे.



गप्पा विध सीईओ' उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये हा आत्मविश्वास वाढून त्यांच्या शैक्षणिक प्रगतीला चालना मिळेल, अशी अपेक्षा शिक्षण विभागाने व्यक्त केली आहे. या उपक्रमासाठी धारणी, अमरावती, चांदूर रेल्वे, नांदगाव खंडेश्वर, चिखलदरा, मोर्शी आदी तालुक्यातील शाळांचा समावेश आहे.

जिल्ह्यातील 'या' २२ शाळांचासमावेश

जि.प. माध्यमिक शाळाधारणी, जि.प. माध्यमिक शाळा तळेगाव दशासर (धामणगाव रेल्वे), जि.प. माध्यमिक शाळा नांदगावपेठ (अमरावती), जि. प. कन्याशाळा अमरावती, जि. प. माध्यमिक शाळा कळमखार (धारणी), जि. प. मुलांची शाळा अमरावती, जि.प. माध्यमिक शाळा चांदूर रेल्वे, जि. प. माध्यमिक शाळा साद्राबाडी । धारणी), जि.प. माध्यमिक शाळा वाढोणा रामनाथ ((नांदगाव खंडेश्वर), जि. प. उर्दू शाळा अमरावती, जि.प. माध्यमिक शाळा मंगरुळ चव्हाळा, जि.प. माध्यकिशाळा उत्तमसरा, जि.प. माध्यमिक शाळा गौरखेडा बाजार (चिखलदरा), जि.प. माध्यमिक शाळा नया अकोला, जि.प. माध्यमिक शाळा काटकुंभ (चिखलदरा), जि.प. माध्यमिक शाळा अचलपूर, जि.प. माध्यमिक शाळा झाडगाव (धामणगाव रेल्वे). जि.प. माध्यमिक शाळा (अमरावती), जि.प. माध्यमिक शाळा सेमाडोह (चिखलदरा), जि. प. माध्यमिक शाळा कसबेगव्हान (अंजनगाव सुर्जी), जि.प. माध्यमिक शाळा मोर्शी तसेच जि.प. माध्यमिक शाळा जामगाव खडका (वरूड) या शाळांचा समावेश आहे.

# 'समृद्धी'वर कोणत्या ठिकाणी पोर्टा कॅबिनमध्ये प्रसाधनगृहे सुरू केली? हायकोर्टाने मागितली माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

समृद्धी महामार्गावर कोणकोणत्या ठिकाणी पोर्टा कॅबिनमध्ये प्रसाधनगृहे सुरू केली, अशी विचारणा मुंबई उच्च न्यायालयाच्यानागपूर खंडपीठाने गुरुवारी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला करून ही माहिती येत्या सोमवारपर्यंत सादर करण्याचे निर्देश दिले.



महामार्गावरील समृद्धी समस्यांसंदर्भात सामाजिक कार्यकर्ते अनिल वडपल्लीवार यांनी जनहित याचिका दाखल केली आहे. त्यावर न्यायमूर्तिद्वय अनिल किलोर व रजनीश व्यास यांच्यासमक्ष सुनावणी झाली. दरम्यान, राज्याचे महाधिवक्ता डॉ. बिरेंद्र सराफ यांनी समृद्धी महामार्गावर २०० पोर्टा कॅबिनमध्ये प्रसाधनगृहे सुरू करण्यात येणार आहे, अशी माहिती दिली. तसेच, आतापर्यंत १८० पोर्टा कॅबिन लावण्यात आले असून त्यापैकी १२० पोर्टा कॅबिनचा उपयोग सुरू आहे, असेही सांगितले.

**अस्वच्छतेवर नाराजी व्यक्त**

समृद्धी महामार्गावरील मूलभूत सुविधांची योग्य पद्धतीने देखभाल केली जात नसल्यामुळे न्यायालयाने नाराजीही व्यक्त केली. समृद्धी महामार्गाने औरंगाबाद येथे जात असताना मूलभूत सुविधांची दयनीय अवस्था दिसून आली. प्रसाधनगृहे अस्वच्छ होती. सर्वत्र कचरा पसरला होता, असे न्यायालय म्हणाले. त्यावर न्यायालयाने स्वतःचा अनुभव व्यक्त करताना समृद्धी महामार्गावर पोर्टा कॅबिन कोठेच दिसून आले नाही, असे नमूद करून वरील निर्देश दिले.

**याचिकाकर्त्यांनी करावी पाहणी**

महामंडळाद्वारे माहिती सादर करण्यात आल्यानंतर याचिकाकर्त्यांनी प्रत्यक्ष ठिकाणी जाऊन पोर्टा कॅबिनची पाहणी करावी आणि अहवाल सादर करावा, असे आदेशही न्यायालयाने दिले. तसेच, या प्रकरणावर १२ सप्टेंबर रोजी पुढील सुनावणी निश्चित केली. याचिकाकर्त्यातर्फे ॲड. श्रीरंग भांडारकर व ॲड. तेजल आग्रे यांनी कामकाज पाहिले.

# राष्ट्रसंत मोरारी बापू यांना राज्य सरकारकडून अतिथी दर्जा


## मुख्यमंत्री फडणवीस यांचे डॉ. विजय दर्डा यांनी मानले आभार

## आजपासून यवतमाळ येथे भव्य रामकथा यज्ञाला प्रारंभ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६यवतमाळ ३०**

श्रवणीय रामकथेसाठी यवतमाळ येथे येत असलेले जगविख्यात आध्यात्मिक गुरू, कथावाचक, राष्ट्रसंत मोरारी बापू यांना स्टेट गेस्ट अर्थात राज्य अतिथीचा दर्जा देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. शनिवारी (६ सप्टेंबर) यवतमाळ येथे हा रामकथा यज्ञ सुरू होत असून तो १४ सप्टेंबरपर्यंत चालणार आहे.

लोकमत एडिटोरियल बोर्डाचे चेअरमन व राज्यसभेचे माजी खासदार डॉ. विजय दर्डा यांनी संत मोरारी बापू यांना राज्य अतिथी दर्जा देण्याची विनंती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती. मुख्यमंत्र्यांनी ती मान्य केली असून तसा आदेश काढण्यात



आला आहे. त्या अन्वये, राज्यशिष्टाचारानुसार मोरारी बापू यांना त्यांचे नागपूर विमानतळावर आगमन, वर्धा मार्गे यवतमाळ प्रवास आणि यवतमाळ येथील वास्तव्य तसेच यवतमाळ ते वर्धा मार्गे नागपूर या परतीच्या प्रवासात सरकारच्या वतीने योग्य तो सन्मान दिला जाईल. यात पोलिसांकडून मानवंदना, पायलट व एस्कॉर्ट सुविधा आणि रामकथास्थळी बंदोबस्त आदींचा समावेश आहे.

आपली विनंती मान्य करून राष्ट्रसंत मोरारी बापू यांना राज्य अतिथी दर्जा दिल्याबद्दल डॉ. विजय दर्डा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच राज्य सरकारचे आभार मानले आहेत. भारतीय संस्कृतीमधील अध्यात्म तसेच प्रेम, सत्य व करूणा आदी तत्त्वांचा जगभर प्रसार करणारे प्रमुख कथाकार असा अठ्ठ्याहत्तर वर्षीय राष्ट्रसंत मोरारी बापू यांचा लौकिक असून त्यांच्या रसाळ रामकथेचे आयोजन बऱ्याच काळानंतर विदर्भात होत आहे. दर्डा परिवारातर्फे या रामकथेचे आयोजन यवतमाळमध्ये दारव्हा मार्गावरील चिंतामणी कृषी उत्पन्न बाजार समिती यार्डात ६ ते १४ सप्टेंबर या कालावधीत करण्यात आले. धार्मिक व उत्साही वातावरणात शनिवारी सायंकाळी चार वाजता या रामकथेला प्रारंभ होत आहे.

# विद्यापीठातील पदव्युत्तर भौतिकशास्त्र विभागाचे सहा विद्यार्थी सेट परीक्षेत उत्तीर्ण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या पदव्युत्तर भौतिकशास्त्र विभागातील राज पारखी, विजय लोडे, कु. रोशनी बत्रा, कु. प्राची पाटील, कार्तिक म्हात्रे, वैभव साळवे या सहा विद्यार्थ्यांनी सेट परीक्षा उत्तीर्ण करून घवघवीत यश मिळविले आहे.




विभागातील विद्यार्थी नियमितपणे उच्च स्तरावर काम करीत असतात, त्यामुळे विभागात संशोधनाची गुणवत्ता आणि शिस्त कायम राहते. विभागामध्ये एक्स-रे डिफ्रॅक्टोमीटर, फ्लूरोसेन्सस्पेक्ट्रोफोटोमीटर, थर्मोल्युमिनेसेन्सरीडर, हाय-रिझोल्यूशन फायबर ऑप्टिक्स स्पेक्ट्रोफोटोमीटर, स्पिन कोटिंग युनिट, स्प्रेपायरोलिसिस, डिजिटल स्टोरेज ऑसिलोस्कोप अशा मूलभूत आणि प्रगत सुविधा आहेत. विद्यार्थी विविध स्पर्धांमध्ये भाग घेत असल्यामुळे नवनवीन संशोधन करतात व जागतिक पातळीवर कार्य करण्यास सक्षम होतात. त्याचप्रमाणे विभागात विद्यार्थ्यांना प्रशिक्षणासाठी अत्याधुनिक प्रयोगशाळा, तंत्रज्ञानाची साधने उपलब्ध आहेत. विज्ञान स्नातकोत्तर भौतिकशास्त्र हा अभ्यासक्रम करून विद्यार्थी वैज्ञानिक, रेडिओलॉजिस्ट, हवामानशास्त्रज्ञ, फॉरेन्सिक लॅबमध्ये विश्लेषक, आयएएस, वायरलेस स्ट्रीममध्ये पोलीस अधीक्षक, प्राध्यापक, व्याख्याते, शिक्षक, दूरसंचार अधिकारी म्हणून नियुक्त झाले आहेत. विद्यार्थ्यांना विभागप्रमुख डॉ. संदीप वाघुळे, डॉ. जी. जी. मुळे, प्रा. कु. श्वेता वाघमारे, प्रा. अभिषेक धालस्कर, प्रा. प्रियांका गोळे, प्रा. एस. व्ही. राठोड, प्रा. एन. एस. थोरात, प्रा. व्ही. डी. भोरजार, प्रा. जी. आर. सातव तसेच शिक्षकवृंदांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, तसेच विभागप्रमुख डॉ. संदीप वाघुळे, शिक्षकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचा-यांनी अभिनंदन करून त्यांना उज्ज्वल भविष्याच्या शुभेच्छा दिल्या.

# पी. आर. पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांचा शिक्षक दिनी स्तुत्य उपक्रम



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

पी. आर. पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूल मध्ये ५ सप्टेंबर डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस शिक्षक दिन म्हणून साजरा करण्यात आला. यावेळी शाळेच्या प्राचार्यांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला हारार्पण केले.

दरवर्षी भारत ५ सप्टेंबर रोजी देशाचे पहिले आणि माजी राष्ट्रपती, तत्त्वज्ञ आणि भारतरत्न पुरस्कार विजेते डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या वाढदिवसाच्या स्मरणार्थ हा दिवस जगभरात शिक्षक दीन म्हणून साजरा केला जातो. तसेच वर्ग नववी व दहावीच्या शिक्षक झालेल्या विद्यार्थ्यांनी सांगितले की, या उपक्रमातून आम्हाला शिक्षकांविषयी असणारा आदर स्नेहभाव, शिस्तप्रियता तसेच शिक्षकांमुळे विद्यार्थ्यांचा होणारा व्यक्तिमत्व विकास या सर्व गोष्टी आम्हाला शिकायला मिळाल्या.

याप्रसंगी शिक्षकांसाठी वेगवेगळ्या खेळांचे आयोजन सुद्धा करण्यात आले. ज्यामध्ये म्युझिकल चेअर, फन गेम फेमस, डायलॉग इत्यादी. जिंकलेल्या शिक्षकांना शाळेच्या प्राचार्यांच्या हस्ते बक्षीस देण्यात आले. यावेळी शाळेचे प्राचार्य सचिन दुर्गे, उपप्राचार्या सोनल निस्ताने, ज्युनिअर कॉलेज प्राचार्य अंकोश राजगिरे, शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# जे डी पाटील सांगळूदकर महाविद्यालयातील तीन विद्यार्थ्यांची महाराष्ट्र सेट परीक्षा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६दर्यापूर**

श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती संचालित दर्यापूर येथील जे. डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालयातील तीन गुणवंत विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र डएढ - २०२५ मध्ये घवघवीत यश संपादन करून महाविद्यालयाचा तसेच विभागाचा सन्मान वाढविला आहे. श्री. भूषण धांडे (वनस्पतीशास्त्र),श्री. अमोल रोकडे (रसायनशास्त्र) आणि प्रा.सुरज गावंडे (प्राणिशास्त्र) या विद्यार्थ्यांनी आपापल्या विषयामध्ये ही अत्यंत प्रतिष्ठेची परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण केली आहे.या विद्यार्थ्यांच्या घवघवीत यशाबद्दल श्री. शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. हर्षवर्धन प्रतापसिंह देशमुख, तसेच श्री. शिवाजी शिक्षण संस्थेची संपूर्ण कार्यकारणी व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अतुल बोडखे, यांनी मनःपूर्वक अभिनंदन व कौतुक केले.या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अतुल बोडखे यांनी तीनही विद्यार्थ्यांचे कौतुक करताना संपादन केले की, विद्यार्थ्यांनी अभ्यास, चिकाटी व आत्मविश्वासाच्या जोरावर मिळवलेले हे यश प्रेरणादायी आहे. हे विद्यार्थी भविष्यात उत्कृष्ट प्राध्यापक, संशोधक व शिक्षणविषयक मार्गदर्शक म्हणून नक्कीच नावारूपास येतील.वनस्पतीशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. तुषार वानखडे, रसायनशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. पुष्पा दहीकर, व प्राणिशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. प्रिती दिवान यांनी देखील आपल्या विभागातील विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल अभिनंदन केले.

# पुढच्या वर्षी लवकर या!.........पर्यावरणपूरक गणेश विसर्जनासाठी मनपाची आर्टीफिशीयल टँक ची उत्तम व्यवस्था











अनंत चतुर्दशीच्या पार्श्वभूमीवर अमरावती महानगरपालिकेने पर्यावरणपूरक आणि स्वच्छ गणेश विसर्जनाची दिशा ठेवत महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. यंदाच्या वर्षी शहरातील नागरिकांना विसर्जनासाठी नदी, तलाव याठिकाणी न जाता सुलभ आणि सुरक्षित अशी २३ ठिकाणी आर्टीफिशीयल टँकची व्यवस्था करण्यात आली होती. महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या पुढाकाराने साकारलेल्या या उपक्रमामुळे नदी–तलावांचे प्रदूषण टाळण्यास मदत होणार असून स्वच्छतेचे भान राखण्याचा संदेश दिला जात आहे.

## स्वच्छ अमरावतीसाठी पथनाट्याद्वारे जनजागृती – महापालिकेचा अनोखा उपक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

स्वच्छ सर्वेक्षण २०२५ च्या पार्श्वभूमीवर अमरावती महानगरपालिका आणि यंगमार्वल सर्विसेस एलएलपी यांच्या संयुक्त विद्यमाने शहरात व्यापक पथनाट्य जनजागृती मोहिमेचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात गणेश मंडळे, शाळा आणि विविध सार्वजनिक ठिकाणी नाट्यप्रयोगांद्वारे नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत सखोल जागरुकता निर्माण करण्यात आली.

या मोहिमेअंतर्गत ओला-सुका कचरा वेगळा संकलन, कचरा वर्गीकरणाचे महत्त्व आणि प्लास्टिक बंदीचे पालन या विषयांवर केंद्रित नाट्यप्रयोग सादर करण्यात आले. Reduce, Re-use, Recycle या संकल्पनेचा प्रभावी संदेश देत, नागरिकांना पर्यावरणीय व सामाजिक जबाबदारीची जाणीव करून देण्यात आली.



उपक्रमात आझाद हिंद मंडळ, बुधवारा; अनंत सार्वजनिक गणेश मंडळ; न्यू आझाद गणेश मंडळ, इरविन चौक; रुख्मिणी गणेश मंडळ, सायंस्कोर मैदान यांसह अनेक प्रमुख मंडळांनी सहभाग नोंदवला. तसेच श्री संत गाडगे बाबा समाधी स्थळ, राजपेठ बसस्टँड, वडाळी नाका, नागपुरी गेट, एकविरा देवी संस्थान यासारख्या विविध ठिकाणी पथनाट्ये सादर होऊन जनजागृती करण्यात आली.

मनपा शाळा क्र. १२ नागपुरी गेट, शाळा क्र. ८ रामनगर, शाळा क्र. १४ वडाळी यांसारख्या शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थ्यांसाठी विशेष नाट्यप्रयोग आयोजित करण्यात आले.या अभियानात नागरिक, गणेश मंडळांचे पदाधिकारी, स्वयंसेवी संस्था, तसेच मनपाचे अधिकारी व कर्मचारी यांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. सर्वांनीच या उपक्रमाचे भरभरून कौतुक करत अशा उपक्रमांची नियमित आवश्यकता व्यक्त केली.स्वच्छतेच्या दिशेने वाटचाल करत अमरावती महानगरपालिका नागरिकांच्या सहकार्याने शहर स्वच्छ, सुंदर व पर्यावरणपूरक करण्यासाठी सातत्याने असे उपक्रम राबवत राहणार असल्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

### गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या...

## अमरावतीत कृत्रिम तलावात बाप्पांचं विसर्जन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६ अमरावती**

भक्तिमय वातावरण आणि धूमधडक्याच्या उत्साहात गणपती उत्सव साजरा केल्यावर आज अमरावतीकर आपल्या बाप्पांचं विसर्जन करत आहेत. शहरातील वडाळी आणि छत्री तलाव याठिकाणी गणरायाच्या विसर्जनासाठी महापालिकेनं कृत्रिम तलाव तयार केले आहे. या ठिकाणी महापिलिका कर्मचारी आणि पोलीस तैनात आहेत.



**अशी आहे व्यवस्था :**

दस्तुर नगर, राजापेठ, गोपाल नगर, शंकर नगर, नवाथे चौक यासह शहराच्या विविध भागांतील घरगुती आणि छोट्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळातील गणरायाचं विसर्जन छत्री तलाव परिसरात होतं. महापालिका प्रशासनानं छत्री तलावाला लागून पाच मोठे खड्डे खोदून कृत्रिम तलाव निर्माण केला आहे. या तलावातच गणरायाच्या विसर्जनाची व्यवस्था करण्यात आली आहे. छत्री तलाव परिसरात कोणीही जाणार नाही, याची दक्षता बाळगण्यात आली आहे. राजापेठ पोलिसांचा याठिकाणी बंदोबस्त लावण्यात आला आहे. गणपती विसर्जनासाठी येणाऱ्यांना या ठिकाणी पोलीस आणि महापालिका प्रशासनाकडून वेळोवेळी सूचना देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. अमरावती ते भानखेडा या मुख्य मार्गापासून कृत्रिम तलावाच्या दिशेने तलाव परिसरात जाण्याचा आणि बाहेर निघण्याचा स्वतंत्र मार्ग आहे. तर गणपती विसर्जनासाठी येणाऱ्या प्रत्येक कुटुंबाची आणि सार्वजनिक मंडळांची नोंद याठिकाणी घेतली जात आहे. छत्री तलावाप्रमाणेच प्रथमेश तलाव परिसरातही नियोजन पाहायला मिळालं. प्रथमेश तलावात काँग्रेस नगर, रुक्मिणी नगर, गाडगे नगर, विदर्भ महाविद्यालय परिसर, जेल क्वार्टर अशा विविध गावातील गणपतींच विसर्जन होतं.: अमरावती शहरात शुक्रवारपासून घरगुती गणपतींच्या विसर्जनास सुरुवात झाली आहे. आज सर्व घरगुती गणपतीचं विसर्जन केलं जातंय. छोट्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या गणपतींचं विसर्जन आज सुरू झालंय. मोठ्या मंडळातील गणपती विसर्जनासाठी रविवार, सोमवार, मंगळावर बुधवार अशी परवानगी देण्यात आली आहे. विदर्भाचा राजा अशी ओळख असणाऱ्या सर्वात मोठ्या खापर्डे बगीचा परिसरातील ३५ फूट उंच गणरायाची भव्य मिरवणूक गुरुवार ११ सप्टेंबरला निघणार आहे.

## नेर पिंगळाईत ढोल-ताशांच्या गजरात गणपती बाप्पांना जल्लोषात निरोप



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६नेर पिंगळाई**

नेर पिंगळाई येथे गणेश विसर्जन सोहळा अत्यंत उत्साहात व भक्तिमय वातावरणात पार पडला. गावातील विविध मंडळांनी पारंपरिक ढोल-ताशांच्या गजरात मिरवणूक काढत गणपती बाप्पांना निरोप दिला. भक्तगणांनी पुढच्या वर्षी लवकर या असा गजर करत बाप्पांच्या पुढील आगमनाची उत्सुकतेने वाट पाहण्याची भावना व्यक्त केली.अनंत चतुर्दशीच्या दिवशी गणेशोत्सवाचा समारोप गणेश विसर्जनाने झाला. या दिवशी परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहून मिरवणुकीचा आनंद लुटत होते. संपूर्ण मिरवणूक भक्तिरसाने भारलेली असून उत्सवाचा प्रत्येक क्षण स्मरणात राहणारा ठरला.गणेश विसर्जनाच्या मिरवणुकीदरम्यान कुठलाही अनुचित प्रकार घडू नये याकरिता शिरखेड पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. त्यामुळे हा उत्सव शांततेत आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडला.

## वीज मोटरपंप, झटका मशीन, केबल चोरी करणारा अट्टल चोरटा गजाआड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६तळेगाव दशासर**

शेतकऱ्यांच्या विहीरीवरील मोटर, केबल व झटका मशिन चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याच्या पार्श्वभूमीवर अमरावती ग्रामीण पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांनी विशेष मोहिम राबवण्याचे आदेश दिले होते.

या अनुषंगाने तळेगाव दशासर पोलिसांनी केलेल्या कारवाईत एका सराईत चोराला जेरबंद करण्यात यश मिळाले असून, त्याच्याकडून पोलिसांनी दहाहून अधिक गुन्हे उघड करुन १६ मोटरपंप व झटका मशीन जप्त केल्या आहेत. अटक केलेल्या आरोपीचे नाव राजेद्र उर्फ राजा विजय भेदे ( २६, रा. आठवडी बाजार, तळेगाव दशासर, ता. धामणगाव रेल्वे, जि. अमरावती) असे आहे. ३० ऑगस्ट रोजी पोलिसांना



मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे ठाणेदार किरण औटे यांनी विशेष पथक तयार केले. या पथकाने संशयाच्या आधारे राजा भेदेला ताब्यात घेतले. सुरुवातीला त्यानेने उडवाउडवीची उत्तरे दिली, मात्र पुढील चौकशीत त्याने शेतीमधील विहीरीवरील मोटर, केबल व झटका मशीन चोरी केल्याची कबुली दिली.त्याच्याविरुद्ध पोलीस स्टेशन तळेगाव दशासर येथे अनेक गुन्हे नोंद आहेत. यात शेतातील मोटर, झटका मशीन, सोलर सेट अशा शेतीसाठी वापरल्या जाणाऱ्या अवजारांच्या चोरीच्या घटना समाविष्ट आहेत. केवळ तळेगावच नव्हे तर नांदगाव खंडे व बाभुळगाव पोलिस ठाण्यांच्या हद्दीतही त्याने चोरी केल्याची कबुली दिली आहे.

पोलिसांनी या चोरट्याकडून १६ विहीरीवरील मोटर पंप (किंमत सुमारे १,०५,९०० रुपये), २ झटका मशीन (११,८०० रुपये) आणि चोरीसाठी वापरलेली मोटरसायकल (६०,००० रुपये) असा एकूण १,७७,९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

ही कारवाई तळेगाव दशासरचे एपीआय राहुल वानखडे, श्यामकुमार गावंडे, सचिन गायधने, सचिन पवार, संदेश चव्हाण, मनिष कांबळे, बंडु मेश्राम, अमोल तातड, महेश रामटेके तसेच चालक नरेश लोथे यांनी केली आहे.

निसर्गाच्या अवकृपेने शेतकरी त्रस्त; चोरट्यांचा धुमाकुळ : जिल्ह्यात यंदा जिल्ह्यातील बहूतांश भागात अतिवृष्टी झाली असुन शेतकऱ्यांचे हातात आलेले पिक गेले आहे. अतिवृष्टीचा सर्वाधिक फटका सोयाबिनला बसला आहे. पंधरा दिवसात कापणीसाठी येणारे सोयाबिन अतिवृष्टीमुळे आलेल्या रोगाला बळी पडले आहे. त्यामुळे निसर्गाच्या अवकृपेने हातातील पिक गेले असतानाच चोरटे मात्र शेतकऱ्याच्या शेतातील मोटर पंप व इतर साहीत्याची चोरी करुन धुमाकुळ घालत आहे. जिल्ह्यातील ग्रामिण भागात शेतातील विहीरींवरील मोटर पंप तसेच तलाव, धरण, नदीवर लावलेले मोटर पंप चोरणारे चोरटे जिल्ह्यात सक्रिय झाले आहेत.